नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक २१७ * * अकोला * सोमवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## खासगी प्रशिक्षणार्थी विमान कोसळले

■ वृत्तसंस्था, विजयवाडा, दि. ८ :

कर्नाटकातील विजयपुरा जिल्ह्यात रविवारी एका शेतात खासगी प्रशिक्षणार्थी विमान कोसळले. जमिनीवर कोसळण्यापूर्वीच दोन्ही वैमानिकांनी इजेक्ट केले. त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. ही घटना बालेश्वर परिसरातील मंगळूर गावात घडली. माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. या अपघाताच्या कारणांची चौकशी सुरू आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, हे रेड बर्ड एव्हिएशनचे खासगी प्रशिक्षणार्थी विमान आहे, जे कलबुर्गीहुन बेळगावीकडे जात होते. प्राथमिक चौकशीत असे समोर आले आहे की, विमानांच्या इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड झाला होता.

## अमेरिका ताळ्यावर




काल भारत आणि अमेरिका यांच्या करारावर दोन्ही देशांनी संयुक्त निवेदन प्रकाशित केले. भारताने युरोपियन राष्ट्रांबरोबर करार केला. त्यानंतर ट्रम्प यांनी दादागिरी दाखवत भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये अमेरिकन शेतकऱ्यांचा जो शेतमाल आहे तो भारताने खरेदी करावा असा ट्रम्प यांचा प्रयत्न होता. पण भारताने एका अक्षरानेही ट्रम्पचा निषेध केला नाही किंवा त्याला आपले टेरीफ कमी करण्याबद्दल विनंतीही केली नाही. त्यानंतर गेल्या काही दिवसांमध्ये ज्या घटना घडलेल्या आहेत त्यावरून अमेरिकेच्याही हे लक्षात आलेले आहे की, भारतासारख्या विशालकाय देशाची बाजारपेठ एकदा का हातातून गेली. तर भविष्यात अमेरिकेला ही गोष्ट प्रचंड जड जाईल. भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून २५% जास्तीचा अधिभार भारतावर अमेरिकेकडून लावण्यात आला होता. पण भारताने त्याला फारसा प्रतिसाद दिला नाही, अखेर अमेरिकेला आपले टेरिफ घटवण्याची घोषणा करावी लागली. यामुळे ५०% चा अधिभार १८ टक्क्यांवर आला तरी संयुक्त निवेदनात दोन्ही पक्ष म्हणतात की विजय आपलाच आहे. भारत अमेरिकेबरोबर पुढील पाच वर्षात ५०० अब्ज डॉलरचा व्यापार करणार आहे त्यामध्ये अमेरिकेची विमाने, विमानांचे सुट्टे भाग, मौल्यवान धातू, तंत्रज्ञान आणि उत्पादने यासह कुकिंग कोळशाचा समावेश आहे. यानुसार अमेरिकेच्या बाजारपेठेत मच्छीमार आणि शेतकऱ्यांसाठी ३० ट्रिलियन डॉलर्सची निर्यात होणार आहे. हा करार परस्पर हितसंबंधांवर आधारित आहे असे म्हटले जाते. मात्र अमेरिकेच्या कृषी मंत्र्यांनी या करारामुळे अमेरिकेच्या शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे असे म्हटलेले आहे त्यातील महत्त्वाची बाब अशी आहे की भारत अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालावर शून्य अधिभार लावणार आहे. तर काही वस्तूंवर भारत शुल्क कमी करणार आहे. त्यामध्ये भारतीय वस्त्रे, चामड्याच्या वस्तू आणि पादत्राणे, प्लास्टिक आणि रबर उत्पादने सेंद्रिय रसायने यांच्यावर आणि इतर धातूंवर १८% अधिकार लावणार आहे. दोन्ही देशांनी संयुक्त निवेदन केले असले तरी या करारात भारताने आपले मूळ सिद्धांत सोडलेले नाहीत. शेतीमालाला मुक्त व्यापारात स्थान नाही. भारत रशियाकडून तेल खरेदी करणार नाही असे ट्रम्प म्हणतात, पण भारताला हे भविष्यात त्रासदायक करण्याची शक्यता आहे. आज ना उद्या रशिया आणि युक्रेनमधील युद्ध संपल्यावर रशियाकडून तेल खरेदी करणे भारताला सुरू करावेच लागेल. आज जरी ट्रम्पच्या म्हणण्यानुसार रशियाकडून तेल खरेदी करण्यावर जे बंधन आहे ते आज ना उद्या कुठल्या ना कुठल्या मार्गाने आपोआप दूर करावेच लागेल. भारताने जराही पाठपुरावा न करता अमेरिकेने केलेली ही घोषणा निश्चितपणे भारताच्या प्रभावाशी संबंधित आहे. मुख्य मुद्दा असा आहे की गेले काही महिने भारतातील निर्यातदारांना जो तोटा सहन करावा लागला. परंतु सरकारने धीर धरण्यास सांगितल्या नंतर आता त्याची फळे निर्यातदारांना मिळतील यात शंका नाही. अमेरिकेने सर्व जगालाच वेठीस धरलेले होते त्यामुळे अमेरिकेची जगभर अमेरिकेची नाचक्की होत आहे. असे दिसून आल्यावर अमेरिकेला आपला हट्ट सोडावा लागला आणि ट्रम्प यांनी एकतर्फी घोषणा करून वाढीव शुल्क रद्द केले. एकूणच या करारा नंतर भारतीय शेअर बाजारात उत्साह संचारल्याने निर्यातदारांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. ट्रम्प यांनी ज्या ज्या घोषणा किंवा सूचना केल्या त्या सर्वांचे पालन करणे भारताला गरजेचे नाही, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. एकूण घडामोडी पाहता हा करार म्हणजे भारताच्या दृष्टीने फलदायीच ठरेल यात शंका घेण्याचे कारण नाही.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# विदर्भाला मिळाले आंतरराष्ट्रीय एक्सपोजर

## तिसऱ्या ॲडवांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

तीन दिवसांत तब्बल बेचाळीस हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार, २३ देशांचे राजदूत तसेच आंतरराष्ट्रीय उद्योग प्रतिनिधींची उपस्थिती यामुळे यंदाच्या ॲडवांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवामुळे विदर्भाला मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय एक्सपोजर मिळाल्याचे समाधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. नागपूर विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या ॲडवांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या समारोपीय सत्रात ते उपस्थितांना संबोधित करत होते.

यंदाच्या महोत्सवात २३ तांत्रिक सत्रे, २५० मार्गदर्शक, साडेपाच हजारांहून अधिक शिष्टमंडळ प्रतिनिधी, विविध देशांचे राजदूत तसेच ५२ बिझनेस-टू-बिझनेस बैठका आयोजित करण्यात आल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. ॲडवांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या अंतर्गत वर्षभर उपक्रम राबविता यावेत, यासाठी आगामी मे महिन्यात असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे संकुल तयार होत असल्याची माहितीही त्यांनी दिली. यावेळी त्यांनी असोसिएशनने आता सेक्टरनिहाय काम करण्याचा सल्ला देत विदर्भातील २५ विशिष्ट औद्योगिक सेक्टर ओळखून त्यावर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले.

तसेच, आगामी काळात फ्लॅश चार्जिंग तंत्रज्ञानावर चालणाऱ्या १३५ नवीन बसेस प्रवासी सुविधांना अधिक आरामदायी बनवतील, असे




सांगताना त्यांनी पुढील तीन वर्षांत नागपूर शहराला पाइपलाईन द्वारे गॅस उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचाही उल्लेख केला.

तत्पूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात एआयडी सारखी संस्था विदर्भाच्या उद्योग जगाताचा चेहरा मोहरा बदलला असल्याचे गौरव उदगार केंद्रीय एमएसएमई राज्यमंत्री शोभा करंदलाजे त्यांनी काढले. एमएसएमई चे १०० स्टॉल प्रदर्शनात असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. देशातील ३३ कोटीच्या वर उद्योजकांनी एमएसएमई पोर्टल वर ऑनलाइन नोंदणी केली आहे असे सांगून भारताच्या निर्यातीत एमएसएमईचे योगदान ४५% आहे असेही त्यांनी सांगितले. लोकांना नवीन तंत्रज्ञान शिकविण्यासाठी आपले मंत्रालय कौशल्य विकासाला प्राधान्य देत येत आहे. २०२६ च्या बजेट मध्ये सोप्या सबसिडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. विपणन ही समस्या असून ब्रॅण्डिंग सुधारण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली. एक्सपोर्ट दर्जा उत्पादने तयार करण्याचा सल्ला त्यांनी उत्पादकांना दिला. यावेळी राज्यमंत्री पंकज भोयर यांनी ॲडवांटेज विदर्भच्या चमू चे कौतुक केले आणि नितीन गडकरी यांच्या दूरदृष्टीला सत्यात उतरविण्याच्या प्रयत्नांची प्रशंसा केली.

बेस्ट स्टॉल पुरस्कार महा मेट्रोला प्रदान करण्यात आला. तसेच विविध एमएसएमई पुरस्कार प्राप्त उद्योजक व संस्थांचा सत्कारही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला.

### लेटर ऑफ इंटेंट, सामंजस्य करार व सत्कार

* समारोपीय कार्यक्रमादरम्यान एड-टेक क्षेत्रात लर्न कोच आणि असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट अंतर्गत लर्निंग स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.
* सुनील फेरो ॲंड इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड विदर्भात ५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून, या माध्यमातून सुमारे १,५०० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे, अशी माहिती देण्यात आली.
* तसेच आरोह हॉस्पिटॅलिटी आणि महिंद्रा सिग्नेचर यांच्यात फाईव्ह स्टार रिसॉर्ट उभारणीसाठी सामंजस्य करार करण्यात आला.
* नागपूरच्या प्रथम नागरिक महापौर नीता ठाकरे व उपमहापौर लिला हातीबेड यांचा सत्कार केंद्रीय मंत्री शोभा करंदलाजे यांच्या हस्ते, तर नरेंद्र बोरकर यांचा सत्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला.

## दहशतवादाशी तडजोड नाही

■ वृत्तसंस्था, क्वालालंपूर, दि. ८ :



मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या मलेशिया दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात अनेक महत्वाच्या करारावर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. तसेच पंतप्रधान मोदी आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली आहे. पंतप्रधान मोदींचं मलेशियात जंगी स्वागत करण्यात आलं. यावर बोलताना मलेशियातील स्वागत भारत कायम लक्षात ठेवेल, असं म्हणत मोदींनी मलेशियाचे आभार मानले.

पंतप्रधान मोदींनी मलेशियात बोलताना दहशतवादावर मोठं भाष्य करत पाकिस्तानला अप्रत्यक्ष संदेश दिला. दहशतवादाबाबत भारताची भूमिका ठाम आहे, दहशतवादाबाबत भारताचा संदेश अगदी स्पष्ट आहे. दहशतवादाशी कोणतीही तडजोड होणार नाही, असं म्हणत मोदींनी दहशतवादाचा मुकाबला करण्याबाबत भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. दरम्यान, भारत आणि मलेशियामधील धोरणात्मक विश्वास हा आर्थिक परिवर्तनाचा मार्ग आहे, यावर भर देत पंतप्रधान मोदींनी रविवारी दहशतवादाबाबत भारताची भूमिका दृढ आणि तडजोड न करता कायम असल्याची स्पष्ट केलं. शांततेच्या उद्देशाने केलेल्या सर्व प्रयत्नांना भारताचा पाठिंबा अधोरेखित करत शांततेसाठीच्या सर्व प्रयत्नांना भारताचा कायम पाठिंबा असेल असंही मोदींनी स्पष्ट केलं.

## संघात जात-पात नाही

### सर्व समाजाला सोबत घेऊन काम : मोहन भागवत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :



सर्वांचा स्वीकार आणि सन्मान हा भारताचा स्वभाव आहे.आपल्या देशाचे विभाजन झाले त्यावेळी हिंदू-मुस्लीम यांच्यासाठी वेगळा देश म्हणून विभागला गेला. पाकिस्तान, बांगलादेशींनी मुसलमानांचा देश बनवला, भारत देश सर्वांचा बनला कारण आपण हिंदू आहोत, हीच चूक झाली हे म्हणणारी देखील नागरिक आहेत, असे सरसंघचालक मोहन भागवत यांनी म्हटले आहे.

मोहन भागवत म्हणाले की, संघाचे काम सर्व स्तरावर सुरू आहे यामध्ये आम्ही जात-पात करत नाही आम्ही भौगलिक क्षेत्र म्हणून काम करत असतो. शहरातील प्रत्येक परिसरात काम झाले पाहिजे. सर्व जातींच्या लोकांना सोबत घेऊन आम्ही काम करतो. एससी-एसटी किंवा ब्राह्मण असे काही संघात नाही कोणीही सरसंघचालक होऊ शकते. जो संघासाठी वेळ देऊ शकेल असा माणूस संघचालक होऊ शकतो.

मोहन भागवत म्हणाले की, संघाचे स्वयंसेवक जिथे जातात त्यांना माहिती असते की विरोध करणारी मंडळी सुद्धा आपलीच आहे. संघावर खूप अन्याय झाला, संघावर बंदी देखील घालण्यात आली पण जे झाले ते झाले समाज आपला असल्याने ते सोडून द्यायचे. अनेक वेळा लोक विरोध करतात पण नंतर संघाचे विचार आत्मसात करतात.

मोहन भागवत म्हणाले की, समाजामध्ये भाषेचा वाद नाही काही लोकं असतात जे त्यावर वाद घालत असतात. हा स्थानिक आजार आहे त्याला मोठा करण्यात काही अर्थ नाही.तो पसरू नये यासाठी प्रयत्न आपण करू शकतो. राजकारणातील स्वार्थासाठी हे काम होत असते. पण हा वाद मोठा होता काम नाही. काहीच जण गुंडगिरी करतात त्याचा दोष समाजाला देऊन काही फायदा नाही.

मोहन भागवत म्हणाले की, संघ लोकांवर संस्कार करण्याचे काम करतो. त्यातून भ्रष्टाचार बंद होऊ शकतो. १९ वर्षांपासून २५ वर्षांपर्यंत जर लग्न झाले आणि ३ मुले झाले तर मुले आणि त्यांचे पालक दोघेही अतिशय चांगले राहू शकतात. घरात जर एकापेक्षा जास्त मुले असतील तर मुलांचा विकास होत असतो.

## तेलंगणात महात्मा फुलेंच्या पुतळ्याची विटंबना

### छगन भुजबळांचे अमित शाहांना पत्र

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ८ :



तेलंगणामध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, याचे तीव्र पडसाद महाराष्ट्रातील राजकीय वतुर्ळात उमटले आहेत. या घटनेचा निषेध करत ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना तातडीने पत्र पाठवून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. "हा केवळ पुतळ्यावर झालेला हल्ला नसून सामाजिक समतेच्या विचारांवर झालेला घाला आहे," अशा शब्दांत भुजबळांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर गावात काही समाजकंटकांकडून महात्मा जोतिबा फुले यांची मूर्ती तोडण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले असून, तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. या घटनेमुळे महाराष्ट्रासह देशभरातून नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी थेट केंद्रीय गृहमंत्र्यांकडे धाव घेतली आहे.

## भिवंडीतील हरिहर कंपाऊंडमध्ये आग

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :

**१० ते १२ गोदामे जळून खाक**

भिवंडी तालुक्यातील मानकोली येथील हरिहर कंपाऊंड परिसरात गादी आणि पेपर रोलच्या गोदामांना भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीने अल्पावधीतच रौद्र रूप धारण केल्यामुळे परिसरातील सुमारे १० ते १२ गोदामे जळून खाक झाली आहेत. आगीची तीव्रता इतकी मोठी होती की, इमारतीचा पहिला आणि दुसरा मजला पूर्णपणे आगीच्या भक्षस्थानी पडला असून यामध्ये कोट्यवधी रुपयांच्या मालाचे नुकसान झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच भिवंडी अग्निशमन दलाच्या तीन गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन जवानांकडून शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. गोदामांमध्ये ज्वलनशील पदार्थ असल्याने आग विझवताना अडचणी येत असल्या तरी, परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

वीज वितरण कंपनी 'टोरंट पावर'ला याबाबत वेळीच माहिती देऊनही त्यांचे कर्मचारी पोहोचण्यास विलंब झाल्याचा आरोप केला जात आहे. या विलंबादरम्यान आग वेगाने पसरली आणि तिने इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यालाही आपल्या कचाट्यात घेतले, ज्यामुळे आगीची तीव्रता अधिकच वाढली.

आगीची भीषणता लक्षात घेता भिवंडी अग्निशमन दलाच्या तीन गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या असून जवानांकडून आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. सुदैवाने, या भीषण घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही, मात्र गोदामातील साहित्यामुळे कोट्यवधी रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

## अजित पवारांच्या अस्थींचे प्रयागराजमध्ये विसर्जन

■ वृत्तसंस्था,
प्रयागराज, दि. ८ :

दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थी रविवारी प्रयागराज संगम येथे विसर्जित करण्यात आल्या. मुलगा जय पवार यांनी संगमावर पूजा-अर्चा केली. त्यानंतर मंत्रोच्चाराच्या गजरात अस्थी विसर्जन केले. यावेळी जय पवार भावूक झालेले दिसले. ते संपूर्ण कार्यक्रमादरम्यान शांत राहिले. कोणाशीही बोलले नाहीत.

इतकंच नाही, जेव्हा पत्रकारांनी जय यांना प्रश्न विचारले, तेव्हाही ते शांत राहिले, काहीही बोलले नाहीत. पवार कुटुंब चार्टर्ड विमानाने पुणे येथून प्रयागराजला पोहोचले होते. जय वडिलांच्या अस्थी घेऊन अनवाणी पायांनी विमानतळाबाहेर आले. त्यांच्या हातात अस्थींचा बॉक्स होता.

विमानतळापासून संगमापर्यंत मोठ्या ताफ्यासह कुटुंब घाटावर पोहोचले. अस्थी विसर्जनावेळी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतेही उपस्थित होते. खरं तर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवा शाखेचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत अजित पवार यांची 'अस्थी कलश यात्रा' काढण्यात आली होती. १२ राज्यांमधून गेलेल्या या यात्रेचा समारोप आज मुलगा आणि कुटुंबाच्या उपस्थितीत संगमात झाला.

## मोकाट श्वानाचा पाच वर्षीय मुलावर हल्ला

■ वृत्तसंस्था, भोर, दि. ८ :

केंजळ गावात शेतात काम करणाऱ्या ऊसतोड कामगाराच्या पाच वर्षीय मुलावर कुत्र्याने हल्ला केला, आणि या हल्ल्यात त्याचा मृत्यू झाला. वनविभागाने तपासानंतर स्पष्ट केले की, हल्ला करणारे प्राणी कोणतेही वन्यप्राणी नसून, एक कुत्रा होता. चाळीसगाव येथील कृष्णा किरण सोनवणे (वय ५) हे कुटुंबीयांसह केंजळ येथील ऊस फडात कामासाठी आले होते. कृष्णाला शौचास लागल्याने त्याच्या आईने त्याला शेताच्या कडेला पाठवले. कृष्णा परत न आल्याने त्याच्या शोध घेण्यास सुरुवात केली. अखेर त्याला रक्तबंबाळ अवस्थेत शेतात सापडले.

## मोदींनी बांगलादेशाला हिंदूंच्या हत्येसाठी पैसा दिला का?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :



खासदार संजय राऊत यांनी मुंबईच्या महापौर पदाच्या उमेदवार रितू तावडे यांच्या विधानाचा समाचार घेताना केंद्र सरकार आणि भाजपच्या दुटप्पी भूमिकेवर घणाघाती टीका केली आहे. बांगलादेशातील हिंदूंच्या स्थितीवरून त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. "ज्या बांगलादेशात हिंदूंची मंदिरे पाडली जात आहेत आणि हिंदूंच्या कतली होत आहेत, त्याच बांगलादेशला मोदी सरकार अर्थसंकल्पातून कोट्यवधींची मदत का देत आहे?" असा जळजळीत सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे.

## चंद्रपूरात महापौरपदावरून संग्राम सुरू

### महापौर भाजपचाच असणार : सुधीर मुनगंटीवार

■ महासागर प्रतिनिधी,
चंद्रपूर, दि. ८ :



चंद्रपूर महापालिकेवर आपलाच महापौर बसवण्याससाठी कॉंग्रेसच्या विजय वडेट्टीवार आणि धानोरकर गटाने दिल्लीत पक्षश्रेष्ठींसमोर सत्तेच्या वाटाघाटी केल्या आहेत. कॉंग्रेसची तिकडे महापौर पदाची तयारी सुरू असतानाच इकडे शिवसेना ठाकरे गटाच्या मनात वेगळेच काही शिजत असल्याचे समोर आले आहे. भाजपने शिवसेना ठाकरे गटाला ऑफर दिली असल्याचे समजते. तसेच सत्तास्थापनेची आमची पूर्ण तयारी झाली असल्याचे सांगत महापौर आमचाच होईल, असा दावा भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे.

चंद्रपूर शहर मनपात भाजपचा महापौर होण्याच्या दृष्टीने सर्व चर्चा झाल्या असून उद्या दुपारपर्यंत निश्चित घोषणा होईल, असा गौप्यस्फोट सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याशी चर्चा झाली आहे. संगीता खांडेकर आमच्या अधिकृत उमेदवार आहेत. पाठिंबा देणाऱ्या पक्षांशी चर्चा अंतिम टप्प्यात आहे. चर्चा पूर्ण झाली की लेखी स्वरूपात करार होणार असून भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा हा करार करणार असल्याची माहिती मुनगंटीवार यांनी दिली आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, चर्चा कॅमेरासमोर होत नाही. त्यामुळे ती बाहेर सांगणे शिष्टाचाराचा भंग होईल. आमचे खांडेकर महापौर होतील हे नक्की. मी स्वतः निधी आणि विकास कामांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी बोललो आहे. पूर्ण शक्तीनिशी मानपाच्या पाठीशी उभे राहू असेही मुनगंटीवार म्हणाले. तसेच कॉंग्रेसशी निवडणूक पूर्व आघाडी असलेल्या पक्षांशी आमचा संपर्क झाला आहे. मात्र ते सध्या थेट पद्धतीने आम्हाला पाठिंबा देण्याच्या मनःस्थितीत नाहीत, असे मुनगंटीवार म्हणाले.

दरम्यान, कॉंग्रेस पक्षात सध्या गटबाजी सुरू आहे. चंद्रपूरमध्ये सर्वाधिक नगरसेवक हे कॉंग्रेस पक्षाचेच निवडून आल्याने महापौरपदासाठी कॉंग्रेस सज्ज दिसत आहे. परंतु, वडेट्टीवार-धानोरकर यांच्या गटापैकी कोणाला काय मिळणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे. यावर तोडगा काढण्यासाठी दोन्ही गटांनी थेट दिल्ली गाठली होती. तसेच सत्ता पक्षातील वाटेकऱ्यांना स्थायी समितीची जबाबदारी द्यावी, अशी वरिष्ठांमध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे. मात्र, या वाटाघाटीत शिवसेना ठाकरे गटाला फारसे महत्त्व न दिल्याने ठाकरे गट नाराज असल्याची चर्चा आहे.

शिवसेना ठाकरे गटाची नाराजी समोर येताच भाजपने ठाकरे गटाला सत्तेचा प्रस्ताव दिल्याचे बोलले जात आहे. शिवसेनेला सव्वा वर्षांचे महापौर पद तसेच २ वर्ष स्थायी समिती देण्यास तयार असल्याचे सांगितले जात आहे. आता पहिला महापौर शिवसेना ठाकरे गटाचा की भाजपचा यावरून चर्चा अडली आहे. तसेच पहिला महापौर भाजपचाच करायचा, जर हे शिवसेनेला मान्य नसेल तर भाजप विरोधी पक्षात बसेल, अशी माहिती समोर आली आहे.

## औद्योगिक क्षेत्रात गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही : मुख्यमंत्री

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. ८ :

औद्योगिक क्षेत्रात झुंडशाही-गुंडशाही खपवून घेतली जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्राची वेगाने वाढ होताना येथे काहीजण उद्योजकांना त्रास देण्याचे उद्योग करत आहेत, अशी माहिती आपणाला मिळाली आहे. उद्योजकांना होणारा त्रास सहन केला जाणार नाही. अशा घटकांना ठोकून काढू, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. लगेच त्यांनी ठोकून काढू म्हणजे कायद्याने ठोकून काढू अशीही पुस्ती जोडली.

अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील सुपा (ता. पारनेर) औद्योगिक क्षेत्रातील खाजगी प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आज, रविवारी करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार काशिनाथ दाते, आमदार बबनराव पाचपुते, हभप नामदेवशास्त्री, हभप महंत शिवाजी महाराज यावेळी उपस्थित होते.

नागरिकांना उद्योगांकडून त्रास होत असेल तर अधिकृत यंत्रणेकडे दाद मागा. मात्र त्यांना दिलेला त्रास खपवून घेतला जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्रात नवे उद्योग येत असताना येथे काही वाईट उद्योग तयार झाले आहेत. काहीजण उद्योजकांना त्रास देत असल्याची माहिती मिळाली आहे. इज ऑफ डूइंग बिजनेस, उत्पादन खर्च कमी व कायदा-सुव्यवस्था या आधारावर महाराष्ट्रात उद्योग वाढ होत आहे. मात्र अशा परिस्थितीत औद्योगिक क्षेत्रातील एखादी छोटी घटनाही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने गांभीर्याने घेतली जाईल. जिल्हा पोलीस अधीक्षकांना मी तशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्रात उद्योग वाढताना पर्यावरणही जपायचे आहे. त्यामुळे उद्योग हे पर्यावरण पूरकच असायला हवेत. उद्योगवाढ व पर्यावरण एकत्र साधायचे आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी उद्योग वाढ केवळ मुंबई-पुणे क्षेत्रातच होत होती. आता उद्योग वाढीचेही विकेंद्रीकरण सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागात उद्योग सुरू करण्याचे प्रयत्न आहेत. आत्मनिर्भर भारतासाठी मेक इन इंडिया महत्त्वाचे आहे. त्या माध्यमातून आयातीला पर्याय निर्माण करण्याचे प्रयत्न आहेत. भारताची अर्थव्यवस्था वाढताना उत्पादन क्षेत्राचा त्याला मोठा हातभार लागणार आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले, दावोसला गेल्यानंतर आम्ही काय करतो व आल्यानंतर काय होते हे सुपा औद्योगिक क्षेत्रातील तौरल इंडिया या एक वर्षातच उत्पादन सुरू झालेल्या प्रकल्पाने विरोधकांना उत्तर दिले आहे, तेही एका मराठी उद्योजकानेच दिले आहे. तौरल इंडिया या प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांनी प्रकल्पाची माहिती देताना ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून १२०० जणांना रोजगार उपलब्ध झाल्याचे सांगितले.

# नागपूर ते दक्षिण मुंबई प्रवास होणार वेगवान

## समृद्धी महामार्गाला मुंबई सागरी किनारा मार्गाशी जोडण्यासाठी ठाण्यात १८ किमीचा नवीन ८ पदरी रस्ता बांधण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :**

नागपूर - मुंबई समृद्धी महामार्गावरून अतिजलद येणाऱ्या वाहनांना दक्षिण मुंबईत पोहचण्यासाठी वाहतूक कोंडाला सामोरे जावे लागते. आमणे येथून दक्षिण मुंबईत पोहचण्यासाठी वाहनांना किमान दोन तास लागतात. यापुढे प्रवासाचा कालावधी कमी होणार आहे. समृद्धी महामार्गाने नागपूरवरून येणाऱ्या वाहनांना आमणेवरून पुढे थेट दक्षिण मुंबईत पोहचता यावे यासाठी राज्य सरकारने ठाण्यात अंदाजे १८ किमी लांबीचा आठ पदरी रस्ता बांधण्याचा निर्णय घेतला आहे.



याद्दष्टीने चाचपणी सुरू असून हा रस्ता मुंबई - वडोदरा महामार्ग, ठाणे सागरी किनारा मार्गाला आणि समृद्धी महामार्गाला जोडण्यात येणार आहे. या मार्गावरून वाहनांना भविष्यात सागरी मार्ग, सागरी सेतूद्वारे थेट दक्षिण मुंबईत पोहचता येणार आहे. ठाणे, भिवंडी वा मुंबई शहरात येण्याची गरज वाहनांना पडणार आहे. त्यामुळे नागपूर - दक्षिण मुंबई प्रवास थेट आणि अतिजलद करता येणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) नागपूर - मुंबई समृद्धी महामार्गामुळे नागपूर - आमणे, भिवंडी प्रवास अवघ्या सात तासांत करता येत आहे. मात्र आमणेवरून पुढे दक्षिण मुंबईत, वरळी, वांद्रे, अंधेरी, दहिसरला जाण्यासाठी वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते. आमणे - दक्षिण मुंबई प्रवासासाठी दोन तास लागतात. ही बाब लक्षात घेऊन नागपूरहून थेट दक्षिण मुंबईत कसे पोहचता येईल याचा विचार राज्य सरकारकडून सुरू होता. त्यानुसार आता ठाण्यात एक नवीन आठ पदरी रस्ता बांधण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही संकल्पना पुढे आणल्याचेही सूत्रांनी सांगितले. त्यानुसार मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग ते ठाणे सागरी किनारा मार्गाला जोडणारा असा हा मार्ग असणार आहे. हा रस्ता नेमका कुठून सुरू होईल आणि कुठे संपेल याबाबतची माहिती लवकरच समोर येईल. मात्र हा रस्ता आठ पदरी आणि अंदाजे १८ किमी लांबीचा असणार आहे. हा प्रकल्प सध्या प्राथमिक स्तरावर आहे.

अंदाजे १८ किमी लांबीच्या आठ पदरी रस्त्याची बांधणी कोणत्या सरकारी यंत्रणेकडून केली जाणार हेही अद्याप स्पष्ट नाही. मात्र सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या रस्त्याच्या उभारणीची जबाबदारी एमएसआरडीसीकडे सोपविण्यात येण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे २००० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा रस्ता पूर्ण झाल्यास समृद्धी महामार्गावरून येणाऱ्या वाहनांना भविष्यात आमणेवरून या रस्त्याचा वापर करून उत्तन-विरार सागरी सेतूमार्गे पुढे भाईंदर-वसोर्वा सागरी किनारा मार्गाला आणि त्यानंतर पुढे वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूवरून पुढे जाता येईल.

वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूने पुढे वांद्रे-वरळी सागरी सेतू आणि त्यानंतर मुंबई सागरी किनारा मार्गाने थेट नरिमन पॉईंटला पोहचता येणार आहे. भिवंडी, ठाणे, मुंबई शहरात येण्याची गरज वाहनांना पडणार नाही. तर मुंबई-वडोदरा महामार्गावरून येणाऱ्या वाहनांनाही समृद्धीला पोहचणे सोपे होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

# किरकोळ कारणावरून दोघांवर चाकूने वार

■ **वृत्तसंस्था, हिंगोली, दि. ८ :**

हिंगोली शहरातील हरणचौक भागात किरकोळ कारणावरून दोघांवर चाकूने वार करून तसेच लोखंडी रॉडने मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पाच जणांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात शनिवारी ता. 7 रात्री गुन्हा दाखल झाला आहे. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली शहरातील तलाबकट्टा भागातील सय्यद वसीम यांचा अब्बास कुरेशी याच्यासोबत किरकोळ कारणावरून वाद झाला होता.

त्यानंतर सय्यद वसीम हे शुक्रवारी ता. 6 शहरातील हरण चौक भागात आले असतांना पेन्शनपुरा भागातील अब्बास कुरेशी, महेफुज कुरेशी, शेख आदील कुरेशी, जुनेद कुरेशी, शोएब कुरेशी हे पाच जण त्या ठिकाणी आले. त्यांनी सय्यद वसीम यांच्या सोबत पुन्हा वाद उकरून काढला. शाब्दिक चकमकी नंतर हाणामारीला सुरुवात झाली.

या हाणामारीत अब्बास कुरेशी याने लोखंडी रॉडने सय्यद वसीम यास मारहाण केली तसेच इतरांनी त्यांच्या हातातील चाकूने सय्यद वसीम यांच्या डोक्यात वार केले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर सय्यद वसीम यांचे भाऊ सय्यद कलीम हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनाही पाच जणांनी लोखंडी रॉडने मारहाण केली तसेच त्यांच्यावर चाकूने वार केले. या मारहाणीत सय्यद वसीम व सय्यद कलीम हे दोघे गंभीर जखमी झाले.

या घटनेची माहिती मिळताच हिंगोली शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक संदीप मोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक संजय मार्के, जमादार अशोक धामणे, शेख मुजीब, संतोष करे, गणेश लेकुळे, ठोंबरे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

# बनावट चलनाच्या माध्यमातून फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. ८ :**

जालना जिल्ह्यातील अंबड शहरात बनावट भारतीय चलनाच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पदार्फाश केला आहे. या कारवाईत एका विधीसंघर्षग्रस्त बालकासह पाच जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून 1 लाख 22 हजार रुपयांच्या बनावट 500 रुपयांच्या नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. यामुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.



गुप्त माहितीच्या आधारे अंबड पोलिसांना माहिती मिळाली होती की, अंबड शहर परिसरात मोठ्या प्रमाणावर 500 रुपयांच्या बनावट नोटांचा व्यवहार सुरू आहे. या माहितीवरून पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवली आणि संशयास्पद व्यक्तींवर लक्ष ठेवले. विशेष पथक तयार करून आणि योग्य संधी साधून पोलिसांनी आरोपींना जाळ्यात ओढले.अंबड-पाचोड रोडवर दोन पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी शोधमोहीम राबवली. यावेळी संशयित विकास अनिल गडगूळ (वय 26) आणि एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले. तपास सुरू असताना त्यांच्या जवळ 500 रुपयांच्या बनावट नोटा आढळून आल्या. यावरून पोलिसांना शंका आली की हे केवळ एक लहानसे प्रकरण नसून मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता आहे.

पोलिसांच्या अधिक तपासानंतर, आरोपी विकास गडगूळने कबूल केले की, त्याने बनावट नोटा समरवीर सुनील खरात (वय 21) याच्याकडून घेतल्या होत्या. पोलिसांनी तत्काळ समरवीर खरात यालाही ताब्यात घेतले आणि त्याच्याकडून आणखी बनावट नोटा जप्त केल्या. चौकशीदरम्यान, समरवीर खरातने दोन अन्य आरोपींची नावे सांगितली - आकाश नारायण शेळके (वय 28) आणि आदित्य सुमित गायकवाड (वय 19).पोलिसांनी या दोघांना देखील ताब्यात घेतले आणि पंचासमक्ष त्यांची झडती घेतली. या झडतीत एकूण 244 बनावट 500 रुपयांच्या नोटा सापडल्या, ज्यांची एकूण किंमत 1 लाख 22 हजार रुपये इतकी आहे. या नोटांच्या मदतीने आरोपी बाजारात आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न करत होते.

पोलिस निरीक्षक संतोष घोडके यांनी सांगितले की, "या बनावट चलनाच्या साखळीमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा शोध घेतला जात आहे. बनावट नोटांचा वापर आणि त्याचा बाजारात होणारा पसराव आर्थिक स्थिरतेसाठी धोका निर्माण करणारा आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या फसवणुकीसाठी कठोर कारवाई केली जाईल."या प्रकरणामुळे जालना जिल्ह्यात बनावट चलनाच्या वापरावर पुन्हा एकदा गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी याबाबत कठोर पावले उचलली आहेत आणि या साखळीच्या मागे असलेल्या व्यक्तींविरोधात तपास सुरू ठेवला आहे.

# ८ पोलीस कर्मचारी निलंबित

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती यांनी पोलिस कर्मचा?यांच्या गैरजबाबदारीमुळे ८ पोलिस कर्मचार्यांना निलंबित केले आहे. तसेच दोन पोलिस कर्मचार्यांना सेवेतून बरखास्त करण्यात आले आहे. पोलिस विभागाच्या कामकाजावर शंका निर्माण होईल अशी गैरवर्तनाची कारवाई करणारे हे निर्णय घेण्यात आले आहेत. मुंबई पोलिसांच्या कामकाजामध्ये शिस्त आणि दक्षता सुनिश्चित करण्यासाठी आयुक्त देवेन भारती यांनी एक मोठा पाऊल उचलला आहे. मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या तपासानंतर काही पोलिस कर्मचार्यांवर गंभीर आरोप सिद्ध झाले होते, ज्यामुळे मुंबई पोलिस दलाच्या शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या निर्णयामुळे पोलिस दलात अनुशासन राखण्याच्या आयुक्तांच्या कडक भूमिकेचा पुनः आढावा घेण्यात आला आहे.निलंबित करण्यात आलेल्या पोलिस कर्मचार्यांच्या वागणुकीत गंभीर दुर्लक्ष आणि कामाच्या अडचणींचा संदर्भ आला होता. याशिवाय, दोन पोलिस कर्मचारी त्यांच्यावरील कार्यात गंभीर दुर्लक्ष आणि असंवेदनशीलतेमुळे निलंबनास पात्र ठरले. त्यांनी पोलिसी कामकाजातील आवश्यक नियम आणि कायद्याचे उल्लंघन केले होते, म्हणून त्यांना सेवेतून बरखास्त केले. मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती यांनी या प्रकरणी एक स्पष्ट संदेश दिला आहे की, पोलिस दलाच्या प्रत्येक सदस्यावर शिस्त राखणे अनिवार्य आहे आणि पोलिसांच्या गैरवर्तनावर कडक कारवाई केली जाईल. हे निर्णय पोलिस विभागाच्या कामकाजातील पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखण्यासाठी घेतले गेले आहेत.

# महाशिवरात्रीसाठी भीमाशंकर मंदिर बंद राहणार

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ८ :**

सन 2027 मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने विशेष विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे. प्रयागराज येथील महाकुंभ 2025 च्या अनुभवावरून, नाशिक कुंभमेळ्यादरम्यान भीमाशंकर येथे दररोज सुमारे एक लाख भाविक येण्याची शक्यता आहे. या भाविकांना सुरक्षित, सुयोग्य आणि सुसज्ज सुविधा देण्यासाठी विविध पायाभूत कामे हाती घेण्यात आली आहेत.

या विकास आराखड्याअंतर्गत नवीन भव्य सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था, पायरी मार्ग आणि गर्दी व्यवस्थापनासाठी आवश्यक सुविधांची कामे वेगाने सुरू आहेत. कुंभमेळ्यापूर्वी सर्व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जुन्या सभामंडपाचे क्षेत्रफळ अपुरे पडणार असल्याने नवीन सभामंडपाचे काम हाती घेण्यात आले आहे.

मुख्य सभामंडप पूर्णतः उतरवण्यात आल्यामुळे आणि नवीन सभामंडप तयार करताना, मंदिराचे दर्शन बंद ठेवल्याशिवाय हे काम करणे शक्य नव्हते. बांधकाम साहित्य, मोठे दगड आणि अन्य यंत्रसामग्री मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर ठेवण्यात आली आहे. कामाचे स्वरूप, परिसरातील भौगोलिक परिस्थिती आणि भाविकांची मोठी संख्या लक्षात घेता, बांधकाम सुरू असताना मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे हे सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक ठरू शकते. यापूर्वी भाविकांची सुरक्षितता आणि विकास आराखड्यातील कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या उद्देशाने मंदिर तीन महिन्यांसाठी (महाशिवरात्रीचा कालावधी वगळून) तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.



मात्र, सध्या सुरू असलेल्या बांधकामाचा वेग, व्याप्ती आणि सुरक्षेच्या बाबींचा सखोल आढावा घेतल्यानंतर, महाशिवरात्रीच्या कालावधीत (12 फेब्रुवारी 2026 ते 18 फेब्रुवारी 2026) मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे सुरक्षित नसल्याचे निदर्शनास आले आहे. मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात दगडी बांधकाम सुरू असल्याने आणि बांधकाम साहित्य हलवणे शक्य नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

श्री क्षेत्र भीमाशंकर हा अतिवृष्टीचा प्रदेश असून जून ते सप्टेंबर या कालावधीत येथे अत्यंत जास्त पावसाचे प्रमाण असते.

# सुप्रिया प्रॉडक्शनच्या एकांकिका स्पर्धेत 'घाटी' तील 'पाकिस्तानचं यान' सर्वोत्कृष्ट

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :**

सुप्रिया प्रॉडक्शन्स आयोजित बोलीभाषा एकांकिका स्पर्धेत दहा बोलीभाषेतील अठरा एकांकिकांमधून 'पाकिस्तानचं यान' या घाटी बोली भाषेतील एकांकिकेने सर्वोत्कृष्ट स्थान पटकावत बाजी मारली. मुंबईच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात बोलीभाषा एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी जबरदस्त रंगली. या स्पर्धेत राज्यभरातून १० बोलीभाषांतील १८ एकांकिका सहभागी झाल्या होत्या. त्यातून अंतिम फेरीत एकूण सात एकांकिका सादर झाल्या. त्यामध्ये नाट्यांकुर, मुंबई या संस्थेची 'पाकिस्तानचं यान' ही घाटी बोलीभाषेतील एकांकिकेने सर्वोत्कृष्ट पुरस्कार पटकावला. नटश्रेष्ठ गोपीनाथ सावकार पुरस्कार देऊन या एकांकिकेला गौरविण्यात आले.



यंदा या स्पर्धेचे नववे वर्ष होते. नाट्यारंभ, एन.के.टी.टी., ठाणे या संस्थेची मालवणी बोलीभाषेतील 'सत्य' ही एकांकिका द्वितीय आणि नक्षत्र कलामंच, मुंबई या संस्थेची खान्देशी बोलीभाषेतील 'पाकळ्या' ही एकांकिका तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. प्रेक्षक पसंती एकांकिका म्हणून 'डिझाईन' या एकांकिकेला पारितोषिक मिळाले. सुप्रिया गोविंद चव्हाण यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. नामवंत रंगकर्मी डॉ. मिलिंद शिंदे, मंगेश सातपुते व संदीप रेडकर यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेच्या पुरस्कार वितरणावेळी विजेत्यांसह सर्व स्पर्धकांनी जबरदस्त जल्लोष केला.

# 'मयत' मतदारांच्या नावाने मतदानाचा प्रयत्न

■ **वृत्तसंस्था, सिल्लोड, दि. ८ :**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शनिवारी मतदान सुरू असताना सिल्लोड तालुक्यातील डोंगरगाव सर्कलमध्ये लोकशाहीला काळिमा फासणारा प्रकार समोर आला आहे. मयत मतदारांच्या नावावर बोगस मतदान करण्याच्या उद्देशाने आलेल्या दोन संशयित व्यक्तींना रंगेहात पकडण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे हा गैरप्रकार उघडकीस आला असून, या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे. डोंगरगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये शनिवारी दुपारच्या सुमारास मतदान प्रक्रिया सुरू होती. यावेळी दोन व्यक्ती मतदान केंद्रावर आल्या आणि त्यांनी मयत असलेल्या मतदारांच्या नावाने मतदानाची चिठ्ठी सादर केली. केंद्रावर उपस्थित असलेल्या भाजपाचे डोंगरगाव मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लु यांना या व्यक्तींच्या हालचाली संशयास्पद वाटल्या.

# मविआ संपली, उद्धव ठाकरे एकटेच

■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. ८ :**



उद्धव ठाकरे यांना पुन्हा विधान परिषदेत जायचे असल्यास इतर पक्षांचा पाठिंबा आवश्यक आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस त्यांना विधान परिषद निवडणुकीत साथ देतात का, हे पाहावे लागेल. त्या पाठिंब्याशिवाय त्यांचे आमदार होणे शक्य नाही. उद्धव ठाकरे यांनी यापूर्वी विधान परिषदेवर निवड होऊन मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली होती. मात्र सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या समोर कोणतीही थेट निवडणूक उपलब्ध नाही. त्यामुळे सभागृहात जाण्यासाठी विधान परिषदेचा मार्ग हाच एकमेव पर्याय उरतो, असे मत मंत्री संजय शिरसाट यांनी व्यक्त केले आहे.

महाविकास आघाडीबाबत बोलताना शिरसाट यांनी स्पष्ट केले की, काँग्रेसने अनेक ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवल्या आहेत. त्यामुळे महाविकास आघाडी आता अस्तित्वात राहिलेली नाही. काँग्रेसची शरद पवार गट सोबत जाण्याचीही इच्छा उरलेली नाही, तर उद्धव ठाकरे गटाला त्यांनी आधीच बाजूला केले आहे. आगामी काळात काँग्रेस स्वबळावरच राजकारण करेल, असेच चित्र दिसत आहे. मुंबईत संख्याबळ नसल्याने त्यांनी उमेदवार दिला नाही उगाच मराठी माणूस म्हणून काही बोलू नये. मविआ आता राहिलेली नाही. शरद पवार राज्यसभेवर जाणार नाहीत, ते काय निर्णय घेतात याकडे सवार्चे लक्ष लागलेले आहे. बारामतीमध्ये पोटनिवणुकीत बिनविरोध निवडणूक होईल असे वाटते.

# चिन्मय मिशनच्या ७५ व्या वर्षपूर्ती निमित्त 'चिन्मय अमृत यात्रा' मुंबईत दाखल



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**

चिन्मय अमृत महोत्सवाच्या अंतर्गत, चिन्मय मिशनच्या ७५ वर्षांच्या उत्सवाचा भाग म्हणून चिन्मय अमृत यात्रा मुंबईत दाखल झाली. या यात्रेच्या आगमनाने मुंबईकरांनी एका सखोल आध्यात्मिक क्षणाचा अनुभव घेतला. पूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानंद यांचा वारसा लाभलेली ही यात्रा आपल्यासोबत पवित्र वस्तू, दुर्मिळ संग्रहित ठेवा आणि वेदांताचे शाश्वत ज्ञान घेऊन आली आहे.जागतिक प्रमुख पूज्य स्वामी स्वरूपानंद यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मिशनचे माजी जागतिक प्रमुख पूज्य स्वामी तेजोमयानंद यांच्या सान्निध्यात मुंबईत यात्रेचे स्वागत करण्यात आले. या स्वागत सोहळ्याने चिन्मय मिशनच्या वर्षभर चालणाऱ्या स्मृतियात्रेतील एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठल्याचे अधोरेखित केले.

'चिन्मय अमृत यात्रा' ही २९५ दिवसांची एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक यात्रा आहे. या यात्रेचा प्रारंभ ३१ डिसेंबर २०२५ रोजी पुणे येथील 'चिन्मय विभूती'तून झाला असून, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे तिचा समारोप होईल. सुमारे ३५,००० किलोमीटरचा टप्पा पार करणारी ही यात्रा भारतातील प्रमुख प्रदेशांमधून प्रवास करणार आहे. इतकेच नव्हे तर, नेपाळ आणि श्रीलंका या देशांमध्येही ही यात्रा आपला प्रवास विस्तारणार असून, याद्वारे वेदांताच्या ज्ञानाची वैश्विक प्रासंगिकता संस्कृती आणि सीमांच्या पलीकडे अधिक दृढ केली जाणार आहे.या यात्रेचा मुख्य आध्यात्मिक आधारस्तंभ म्हणजे 'डिजिटल यज्ञ'. यामध्ये पूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानंद यांच्या निवडक प्रवचनांचा संग्रह असून, तो प्रादेशिक भाषांमधील उपशीर्षके (२४३३ र्ै२) आणि आवाजासह उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे अभ्यासकांना, विशेषतः तरुणांना आणि प्रथमच हे ज्ञान घेणाऱ्या श्रोत्यांना भगवद्गीतेच्या शिकवणुकीशी अर्थपूर्णरित्या जोडले जाणे आणि गुरुदेवांच्या शाश्वत मार्गदर्शनाचा सखोल अनुभव घेणे शक्य होणार आहे.तसेच, या यात्रेचे खास वैशिष्ट्य म्हणजे विशेषरित्या तयार केलेली 'चिन्मय वाहिनी' (फिरते प्रदर्शन), जी पूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानंद यांचे जीवन आणि त्यांच्या शिकवणुकीचा एक तल्लीन करणारा अनुभव भाविकांना प्रदान करते. या वाहिनीमध्ये गुरुदेवांच्या अत्यंत वैयक्तिक आणि पवित्र वस्तू जतन करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये त्यांच्या पूजनीय पादुका, वस्त्रे आणि त्यांनी प्रत्यक्ष वापरलेल्या इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश आहे.

# लग्नास नकार मिळाल्याने तरुणाची लॉजमध्ये आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. ८ :**

सोलापूरमध्ये मागील सहा वर्षांपासून असलेल्या प्रेमसंबंधांना लग्नाची जोड न मिळाल्याने आणि मुलीच्या कुटुंबीयांनी नकार दिल्याने, एका 28 वर्षीय तरुणाने नैराश्यातून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हरीश भास्कर बंडी (रा. वल्लभनगर, सोलापूर) असे या मृत तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हरीशचे त्याच्या नात्यातीलच एका तरुणीशी मागील सहा वर्षांपासून प्रेमसंबंध होते. या नात्याचे रूपांतर लग्नात व्हावे, यासाठी हरीशच्या कुटुंबीयांनी दोन वेळा मुलीच्या घरी जाऊन रीतसर मागणी घातली होती. मात्र, पत्रिका जुळत नाही असे कारण पुढे करत मुलीच्या आई-वडिलांनी या लग्नास स्पष्ट नकार दिला.

लग्नास नकार मिळाल्यापासून हरीश तीव्र मानसिक तणावाखाली होता. त्याने एकदा तरी मुलीशी बोलू देण्याची विनंती केली होती, मात्र मुलीच्या कुटुंबीयांनी ती मान्य केली नाही. मुलीचा मोबाईल बंद करण्यात आला होता. तिच्याशी कोणताही संपर्क होऊ न दिल्याने हरीश अधिकच खचला. घरच्यांनी त्याला सावरण्याचा प्रयत्न केला, पण विरहाच्या वेदनेतून त्याने शहरातील एका लॉजमध्ये जाऊन टोकाचे पाऊल उचलले.

# जि.प. निवडणुकीत बोगस मतदान करणाऱ्या सहा जणांविरुद्ध गुन्हा

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ८ :**

जिल्हा परिषद निवडणुकीत बोगस मतदान करणाऱ्या सहा जणांना पकडले. त्यांच्याकडून बनावट आधारकार्ड जप्त करण्यात आले. नगर रस्त्यावरील केसनंद भागात असलेल्या एका मतदान केंद्रावर ही घटना घडली.

या प्रकरणी एका महिलेसह सहा जणां विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेले आरोपी बांधकाम मजूर आहेत. ते सध्या केसनंद भागातील नियोजित गृहप्रकल्पाच्या आवारात राहायला आहेत. याबाबत पोलीस हवालदार बाळासाहेब हराळ यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषदेचे मतदान शनिवारी (७ फेब्रुवारी) पार पडले. केसनंद भागातील श्री जोगेश्वरी विद्यालयाच्या आवारातील मतदान केंद्रात तीन आरोपींनी मतदान केले. तीन जणांची मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यांनी चौकशी केली. तेव्हा त्यांच्याकडे बनावट आधारकार्ड आढळून आले. पोलिसंनी सहा जणांना ताब्यात घेतले.

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेले तीन आरोपी मूळचे उत्तर प्रदेशातील आहेत. उर्वरित तीन आरोपी वाशीम जिल्ह्यातील आहेत. गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर तपास करत आहेत.

# सह्याद्रीच्या कुशीत 'हिरकणी'चा संचार

## पेंचमधून आणलेल्या वाघिणीचे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात पुनर्वसन

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ८ :**

पश्चिम महाराष्ट्रातील निसर्गसमृद्ध सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आज ७ फेब्रुवारी रोजी पहाटे एका वाघिणीला निसर्गमुक्त करण्यात आले. 'STR 06' असे शासकीय नाव असलेल्या या वाघिणीला पेंच व्याघ्र प्रकल्पातून आणले असून, तिला कोयना वन्यजीव अभयारण्यातील कोअर जंगल क्षेत्रात सुरक्षितरीत्या सोडण्यात आले आहे. विशेष म्हणजे, सह्याद्रीतील वाटाड्यांनी (गाईड्स) या वाघिणीचे नामकरण 'हिरकणी' असे केले आहे.

'STR 06 या वाघिणीला गुरुवार, ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता पेंच व्याघ्र प्रकल्पातील नागलवाडी वनपरिक्षेत्रातून पकडण्यात आले होते. त्यानंतर रस्तेमार्गे तिची वाहतूक सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात करण्यात आली. शुक्रवारी रात्री तिला बोटीने प्रवास घडवून कोयना अभयारण्यात आणले गेले. येथे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिची कसून आरोग्य तपासणी केली. प्रवासाचा



थकवा असतानाही तिने दिलेले पाणी आणि मटण फस्त केले, जे तिच्या सुदृढ प्रकृतीचे लक्षण मानले गेले. शनिवारी सकाळी ६ वाजता सर्व सुरक्षा निकषांचे पालन करून तिला जंगलात मुक्त करण्यात आले.

**'बाजी' आणि 'हिरकणी'ची जमणार जोडी**

कोयना अभयारण्यात आधीच 'STR 03' (बाजी) नावाचा एक नर वाघ वास्तव्यास आहे. आता 'हिरकणी'च्या आगमनामुळे बाजीला जोडीदार मिळाला असून, भविष्यात येथे वाघांची संख्या वाढण्याची चिन्हे आहेत. सातारा, सांगली आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांत पसरलेल्या ११६५ चौ. किमी क्षेत्रासाठी हा ऐतिहासिक क्षण असल्याचे मानले जात आहे.

या वाघिणीला पेंच व्याघ्र प्रकल्पात 'ढळफ 123' या क्रमांकाने ओळखले जायचे. सह्याद्रीत आल्यावर तिला 'STR 06' हा नवीन शासकीय क्रमांक देण्यात आला. मात्र, स्थानिक गाईड मंडळींनी महाराष्ट्राच्या इतिहासातील पराक्रमाची आठवण म्हणून तिला 'हिरकणी' हे नाव दिले आहे.

हे संपूर्ण ऑपरेशन सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक तुषार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यामध्ये उपसंचालक किरण जगताप, सहाय्यक वनसंरक्षक बाबा हाक्के, संग्राम गोडसे, अक्षय साळुंखे, विजय बाटे, तुषार जानकर, अक्षय करमळकर यांच्यासह मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे, सुनील भोईटे आणि वनपाल, वनरक्षक यांनी मोलाची भूमिका बजावली.





# अकोला नगरीत ‘श्री’चा जयजयकार







▪अकोला,दि.८ (प्रतिनिधी)▪

संत शिरोमणी श्री गजानन महाराज आणि अकोला वासियांचे एक अतूट नाते आहे. पंढरपूरला जाणाऱ्या गजानन महाराजांच्या पालखीचे जेवढे अकोला शहरात स्वागत होततेवढे कुठेही होत नाही. दर गुरुवारी अकोला

शहरातून शेगावला पैदल वारी करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. जेवढ्या उत्साहात संत नगरी शेगाव मध्ये गजानन महाराजांचा प्रगट दिन साजरा केला जातो त्याचप्रमाणे अकोला शहरातही मोठ्या प्रमाणात प्रगट दिन साजरा केला जातो शहरातील श्री संत गजानन महाराजांच्या मंदिरातच नव्हे तर घरोघरी सुद्धा संत गजानन महाराजांना त्यांच्या आवडत्या पिठलं भाकरीचा नैवेद्य दिला जातो. आज रविवारी, संत गजानन महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त अकोला शहर पूर्णपणे श्री गजानन भक्तीत बुडाले होते.

संपूर्ण शहरात श्रद्धा, उत्साह आणि भक्तीचे अद्भुत वातावरण दिसून आले. या निमित्ताने शहरात १ फेब्रुवारीपासून सुरू झालेला श्रीमदब भागवत कथा स्वतःची समाप्ती गोपालकाला व कीर्तनाने करण्यात आली. अकोला शहरातील जुने शहर डाबकी रोड जठार पेठ उमरी गोरक्षण रोड रामदास पेठ मोठे राम मंदिर बिर्ला राम मंदिर मुकुंद पेठ परिसरातील श्री गजानन महाराज मंदिर जठार पेठ परिसरातील श्री गजानन महाराज मंदिर तसेच अनेक शेकडो मंदिरांमध्ये महाराजांचा प्रगट दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.श्रींच्या प्रगट दिनानिमित्त संत गजानन महाराज मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काहीं मंदिरांमध्ये श्रीमदब भागवत कथा, तर काही मंदिरांमध्ये श्री राम कथा आणि घरोघरी नियमित गजानन महाराजांच्या विजय ग्रंथाचे पारायण करण्यात आले, रविवारी गोपाळकाला आणि महाप्रसाद वाटपाने या सर्व कार्यक्रमांचा समारोप करण्यात आला. शहरातील सर्वच गजानन महाराज मंदिरांच्या विश्वस्तांनी शक्य तितक्या भाविकांना या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन आधीच केले होते.

अनेक मंदिर परिसरात तसेच ज्या भाविकांनी श्रींच्या प्रगट दिनानिमित्त महाप्रसादाचे आयोजन केले होते त्या ठिकाणी अत्यंत श्रद्धेने महाप्रसाद ग्रहण करण्यासाठी भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने रांगा लावल्याचे दिसून आले काही ठिकाणी तर महाप्रसादाचे वितरण स्वरूची भोज पद्धतीने करण्यात आलेआज प्रगट दिनानिमित्त अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन असल्याने काहीजणांनी जेवायला भाविक कमी येतील या भीतीने आपल्या महाप्रसादाचे आयोजन पुढे ढकलले आहे एकंदरीतच या पुढील सप्ताहात अनेक ठिकाणी

## श्रीमद् भागवत हे मुक्तीचे शास्त्र : ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पातोंड



अकोट: स्थानिक अकोट येथील श्री संत गजानन महाराज मंदिर अंजनगाव रोड अकोट येथे श्रीचे प्रगट दिन उत्सवानिमित्त ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पातोंड महाराज यांच्या व्यासपीठ नेतृत्वात संपन्न होत आहे. आईवडिलांची सेवा हिच ईश्वराची सेवा आहे,आईवडिलांची सेवा केल्याने सर्व पाप नष्ट होतात,सोबतच नामस्मरण करा असे आपल्या वाणीतून उपदेश केला.भागवत कथेनिमित्त श्रीचे मंदिरात कृष्ण जन्म तसेच विठ्ठल रुक्मिणी यांचा विवाह संपन्न झाला.भागवत कथा म्हणजे दु:ख नष्ट करणारे अमृत संत साहत्यि मानवासाठी प्रेरक असून विविध धर्मग्रंथांनी मानवाला आत्मकल्याणाचा मार्ग दाखविला आहे. या मार्गावर चालून सर्वांनी आपले जीवन सत्कर्मी लावावे. भागवत कथा म्हणजे दु:ख समूळ नष्ट करणारे अमृत आहे, असे प्रतिपादन ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पातोंड यांनी भागवत कथेच्या समारोप प्रसंगी व्यक्त केले.श्रींचे मंदिरात प्रगट दिनानिमित्त ह.भ.प.मंगेश महाराज जायले यांचे काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे.त्यानंतर भव्य महाप्रसाद वाटप होईल व शहरातून श्रीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्याचे माहिती मंदिर समितीने दिली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री संत गजानन महाराज मंदिर समिती परिश्रम घेत आहेत.

## हिवरखेड नगरीत श्रींचा प्रकटदीन उत्साहात

हिवरखेड येथे उत्साहात गजानन महाराजांचा १४८ व्हा प्रगटदीन सोहळा साजरा करण्यात आला. गावात सर्वत्र भक्तीमय वातावरन दिसून आले, तर श्री पांडुरंग संस्थान व गजानन महाराज संस्थानच्या वतीने श्री संत गजानन महाराज पालखी दिंडी गावातून काढण्यात आली, यामध्ये भाविक महिला, पुरुष, तरुण, तरुणी यांनी हजेरी लावली, तर गावातील प्रत्येक गल्लीत महिलांनी रागोडी काढून पालखीचे ठीक ठिकाणी स्वागत केले, तर प्रगटदिनी गावातील स्वस्तिक कॉलनीतील गजानन महाराज संस्थानच्यावतीने भागवत सप्ताह समाप्ती करून महाप्रसाद वितरीत केला, या स्थळी हजारो भाविकांनी गजानन महाराज दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला, तसेच गावातील प्रभाग ५ मधील मोठा महादेव मंदिराच्या मागील बाजूला असलेले संत गजानन महाराज मंदिर येथे सुद्धा महाप्रसाद वितरीत करण्यात आला, येथील भाविकांनी परिश्रम केले, आणि संध्याकाळी कामठा नगरातील गजानन महाराज मंदिर येथे बेसन भाकरचे आयोजन करण्यात आले, या संस्थांनचे काम सुद्धा प्रगती पथावर सुरू, दिवसभर गावात भाविकांची रेलचेल दिसून आली, काही भाविकांनी गजानन महाराज शेगांव पायी जाणाऱ्या भाविकांसाठी सेवा प्रदान केली.

## गुरुमाऊली वासुदेव महाराज पालखी रथाचे अकोली जहागीर कडे प्रस्थान

▪अकोट,दि.४ (प्रतिनिधी)▪

माऊली श्री संत वासुदेव महाराज यांच्या पालखी रथाचे श्रीक्षेत्र श्रद्धासागर येथून श्री शेत्र अकोली जहागीर येथे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थे अंतर्गत दरवर्षीप्रमाणे सद्गुरु श्री संत गजानन महाराजांनी भास्कर महाराजांचे शेत सर्वे नंबर ५२मध्ये सजल केलेल्या विहिर संस्थांच्या सद्गुरू श्री गजानन महाराज प्रगट दिन कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गुरुमाऊली श्री च्या पालखी रथाचे प्रस्थान झाले

दरम्यान श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे श्रींच्या रजत मुखवटा व पादुकांचा अभिषेक,रथ पुजन संस्थाध्यक्ष वासुदेवराव महल्ले यांच्या हस्ते पार पडले श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे वारकरी शिक्षण संस्थेच्या बालवैष्णव तथा गाव गावच्या वारकरी भक्तांचा दिंडी सोहळा अकोट संतनगरी च्या मुख्य मार्गावरून मार्गक्रमण करीत अकोली जहागीर येथे पोहोचला दरम्यान अकोट नगरीतील विविध संस्था व संघटनांनी या पालखी सोहळ्याचे भावपूर्ण स्वागत केले. टाळ मृदंग विना तथा अभंग गाथा निघालेल्या या पालखी सोहळ्यात भक्तगण सहभागी





झाले होते. गण गण गणात बोते. गजानन श्री गजानन गुरु गजानन या जय घोषाने अकोट नगरी दुमदुमून गेली होतीश्रद्धासागर येथून श्रींचे पालखी सोहळा पायदळ दिंडीचे प्रस्थान झाले.श्री शिवाजी महाविद्यालय येथे प्राचार्य डॉ सुनील पांडे शनिवारा येथे सुरज ध. वाघ , श्री संत वासुदेव महाराज निवासस्थान येथे माधवराव मोहोकार ,श्री संत वासुदेव महाराज नगर येथे श्री देवेंद्र मेतकर हनुमान मंदिर - श्री दुर्गा माता मैदान येथे तेजस अढीया व मित्र परिवार श्री गजानन महाराज मंदिर येथे न.प.चे बांधकाम सभापती मनिष कराळे व माजी नगराध्यक्ष पुरुषोत्तम चौखंडे यांनी श्रींचे पुजन करुन दिंडीक-यांसाठी चहा नाश्ता व थंडपेयाची उत्तम व्यवस्था केली.पठार येथे श्री गजाननभाऊ बोरोकार यांचे कडून स्वागत व शरबत तर वाई येथे श्री बंडूभाऊ ठाकरे यांचेकडे भोजन, तद्नंतर प्रवचन पार पडले. श्रींच्या सजल विहीरीवर पालखु पोहोचताच अकोलीकर भाविकांनी दिंडीचे स्वागत केले.

तद्नंतर श्री संत गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होऊन श्रींच्या दिंडीने श्री क्षेत्र आकोली जहागीरमधून नगर परिक्रमा महाप्रसाद पार पडला या सोहळ्यात संस्थेचे उपाध्यक्ष महादेवराव ठाकरे कोषाध्यक्ष पुरुषोत्तम राजुरकर, सहसचिव अवी गावंडे, विश्वस्त दिलीप हरणे अनिल कोरपे अशोकराव पाचडे ,नंदकिशोर हिंगणकर आदींसह भक्तगण मोठ्या संख्येने या दिंडी सोहळ्या सहभागी झाले होते.

## धाबेकर नगरच्या भागवत व कीर्तन महोत्सवाचा समारोप

**अकोला :** खडकीच्या धाबेकर नगर येथील संत गजानन महाराज मंदिरात संत गजानन महाराज प्रकटदिन महोत्सवा निमित्त हभप मंगेश महाराज वराडे यांच्या भागवत कथा व कीर्तन महोत्सवाचा रविवारी (८ फेब्रुवारी) भक्तीभावाने समारोप झाला.

या समारोप दिवशी हभप भागवत महाराज देशमुख यांचे कालाकीर्तन झाले. यामध्ये भागवतेची उपयुक्तता प्रतिपादित करण्यात आली.या समारोप प्रसंगी अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून उत्सवाची प्रशंसा केली. संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट धाबेकर नगरचे अध्यक्ष राजेश घोगरे, सौ. घोगरे व पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी आयोजित महाप्रसादाचा शेकडो भक्तांनी लाभ घेतला. उत्सवात रात्री ‘दरबार गजानन’ हे संगीतमय संत गजानन महाराज नाट्य मंचन करण्यात आले, ज्याचा परिसरातील भक्तांनी आनंद लेवून घेतला.या महोत्सवा च्या यशस्वीततेसाठी संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट धाबेकर नगर व खडकी बु. चे सर्व पदाधिकारी व नागरिकांनी परिश्रम घेतले.





## आकोलीच्या श्रींनी सजल केलेल्या विहिरीवर प्रकट दिन साजरा

अकोट - येथून जवळच असलेल्या आकोली जहागीर येथील श्री गजानन महाराजांनी सजल केलेल्या विहिरीवर श्री गजानन महाराज संस्थान शेगाव तर्फे श्रींचा १४८ वा प्रकट दिन महोत्सव ८ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात व भक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाला. गत सात दिवसांपासून भाविकांनी योगेश महाराज हिवाळे यांच्या वाणीतून श्रीमदब भागवत कथा श्रवणाचा लाभ घेतला . तसेच सप्ताहामध्ये नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन संपन्न झाले. प्रकट दिनाच्या पूर्व संध्येला श्रीतीर्थ पुष्करणी पासून आकोली जहागीर गावातून श्रींच्या पालखीची परिक्रमा करण्यात आली.या परिक्रमेत श्री संस्थेच्या दिंडी सोबतच अकोट , वडगाव मेंढे,पुंडा,दिवठाणा इत्यादी गाववरून या उत्सवाकरीता आलेल्या दिंड्या व हजारो गजानन भक्त सुद्धा सहभागी झाले होते. गावात ठिकठिकाणी रांगोळ्या काढून व घरोघरी पालखीचे पूजन भावीक भक्तांनी केले.टाळ मृदुंगाचे गजराने आकोली जहागीर नगरी दुमदुमून गेली होती .प्रति शेगावात आल्या सारखे भाविकांना वाटत होते . गावातील प्रमुख मार्गाने , गावातील श्री गजानन महाराज व भास्कर महाराज या गुरू -शिष्यांचे मंदिराजवळून पालखी मार्गस्थ झाली . मार्गात ठिकठिकाणी भाविकांनी श्रींच्या पालखीचे पूजन व स्वागत केले , तसेच शीतपेयाची व्यवस्था सुद्धा करण्यात आली होती . श्रींच्या विहिरीवर मिरवणूकीचा समारोप आरतीने झाला. श्री गजानन महाराज प्रकट दिना निमित्त सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत श्रीधर बुवा अवारे यांचे काल्याचे कीर्तन संपन्न झाले . दुपारी १२ वाजता फुले , गुलाब पुष्पांची उधळण व श्रींच्या नावाचा जयजयकार करण्यात आला. त्यानंतर महाप्रसादाचा उपस्थित सर्व भाविकांनी शिस्तीत लाभ घेतला . श्री संस्थेच्या सेवाधारी मंडळींनी भाविकांच्या दर्शन व महाप्रसादाची व्यवस्था उत्तम प्रकारे केली होती . प्रकट दिनाला हजारो भाविकांनी गजानन महाराज व भास्कर महाराज या गुरू शिष्यांच्या मंदिरात दर्शनाचा व श्रींनी सजल केलेल्या विहिरीच्या श्री तीर्थाचा लाभ घेतला .

## ‘श्री’चा प्रगट दिनाला ठिकठिकाणी महाप्रसादाचे आयोजन

### विवीध भक्त मंडळा कडुन पालखी ट्रक्टरवर मिरवणुक काढुन शहर गणगणात बोते मय झाले



हिवरखेड नगरीत श्री च्या प्रगटदिनाला जूनी चावडी कामठा येथे तर स्वस्तिक कॉलनी येथे भागवत समाप्ती निमित्त तर मोठा महादेव सस्थान जवळ मसूरकार गजानन मंदीर तिरंगा गणेश मंडळाजवळील बाल गजानन मंडळ शकर सस्थान देवळीवेस भा पु नगर मधे सूद्धा श्री गजानन महाराज प्रगट दिनाला श्री ची पालखी ट्रक्टर व सजवीलेले मूर्तीची मिरवनूक तर बालमडंळानी अती ऊत्साहाने पालखी त श्रीच्या प्रतिमाची मिरवनूक काढली दिवसभर हिवरखेड नगरीत गण गणात बोते च्या गजराने म्हनजे श्रिच्या मंत्राने श्री गजानन भक्त भक्तीमय दिसत होते तर गजानन मानव सेवा समीती कामठा जूनी चावडीवर हभप परसराम महाराज सातपुते सूनगाव यांचे व्यासपिठ नेतृत्वात सकाळी काल्याचे कीर्तन झाले तर सध्यांकाळी बेसन भाकरी चा श्री चा आवडिचा नैवेद्द रात्रिला आयोजन येथे ही हजारो लोकानी ऊपस्थीती दर्शविली तर दिवसा सकाळच्याच सत्रामधे स्वस्तिक कॉलनीत हभप वीठ्ठल महाराज तेल्हारकर यांचे काल्याचै कीर्तनाने हरी विजय ग्रथ व भागवत सप्ताह समाप्ती झाली तेथे ही हजारो लोकानी महाप्रसादाला हजेरी लावली तर बाल गजानन भक्तानी विदर्भाची पढरिचा राणा गजानन महाराजा पालखी व भगवा ध्वज टाळ मृदूंग सोबतीला घेऊन लहान मोठ्या मिरनूचीच्या माध्यमातुन काढल्या तर कामठा व स्वस्तीक कॉलनीत ल्या दोन्ही ग्रथ दिडी पालखी शेकडौ वारकरी माळकरी टाळकरी महिला भजनी मंडळाकडुन गणगणात बोते च्या गजरात काढल्या तर ईतर मंडळानी मीरवनूका सजविलेल्या ट्रक्टर अजुनही बातमी लिहे पर्यत चालु होत्या तर मिरवनूक मार्गात सडा सारवण रांगोळीच्या स्वागतानी आरती पुष्पसूमनानी पालख्या मिरवनूकीतीव श्री चे दर्शन गावकरी करताना दिसले तसेच गजानन भक्ताना फराळ अन्नदान वाटप करून श्री गजानन महाराजाचे भक्तीने हिवरखेड श्री गजानन भक्तमय झाल्याचे दीसून आली

# नागपूर–मुंबई राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात

# ट्रक चालक व क्लीनरचा दुर्दैवी मृत्यू

■अकोला,दि.८ (प्रतिनिधी)■

नागपूर–मुंबई राष्ट्रीय महामार्गावर ग्राम कुरुम शिवारातील तीन पुलाजवळ आज ०७ फेब्रुवारी रोजी रात्रीचे सुमारास आयशर ट्रकचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली.

एमएच–२९–बीएफ–६०७४ क्रमांकाचा ट्रक नागपूर येथून संभाजीनगर कडे लोखंडी पाइप घेऊन जात होता. दरम्यान अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्यावरील डिव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेने पुला जवळील खोल दरीत जाऊन पडला. अपघाताच्या धक्क्याने ट्रकमधील लोखंडी पाइप हे ट्रकच्या केबिनमध्ये जाऊन पडले.

आणि ते थेट चालक अनिसउद्दीन रफिकउद्दीन काझी आणि क्लीनर मोहम्मद रेहान मोहम्मद नाजिम (दोन्ही रा. जोहर नगर बुलढाणा) यांच्या अंगावर कोसळले. या गंभीर अपघातात दोघेही अत्यवस्थ जखमी होऊन जागीच ठार झाल्याचे कळते.

घटनेची माहिती मिळताच माना पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले. या घटनेचा पुढील तपास माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवा. दीपक सोळंके करीत आहेत.

# गांधीजींच्या अस्थींच्या साक्षीने उभ्या राहीलेल्या गांधीग्रामला पर्यटन स्थळ घोषित करा

■अकोला,दि.८ (प्रतिनिधी)■



महात्मा गांधीजींच्या अस्थिविसर्जनाचे साक्ष असलेले पश्चिम विदर्भातील अकोला जिल्ह्यातील ' गांधीग्राम ' या गावाला शासनाने पर्यटन स्थळाचा दर्जा द्यावा अशी मागणी ग्रामस्थ, ग्रामपंचायत,अकोला जिल्हा सर्वोदय मंडळ व गावातील हरिपाठ मंडळाचे वतीने करण्यात आली आहे. भारताच्या राष्ट्रपित्याच्या निधनानंतर सी पी अंड बेरार चे तत्कालीन मंत्री ब्रजलालजी बियाणी, लोकनेते डॉ. आबासाहेब खेडकर,नानासाहेब सपकाळ यांच्या पुढाकाराने महात्मा गांधीजींच्या अस्थिकलशाचे विसर्जन अकोला जिल्ह्यातील वाघोली येथील पूर्णा नदी घाटावर करण्यात आले. ही घटना केवळ स्थानिक नव्हे तर राष्ट्रीय इतिहासाचा महत्त्वाचा अध्याय ठरली आहे. या ऐतिहासिक स्मृती जपण्यासाठी दरवर्षी गांधीग्राम येथे १२ फेब्रुवारीला अस्थिविसर्जन स्मृती पर्व साजरे केले जाते.यानिमित्त पूर्णा नदी घाटावर गंगापूजन – सर्वधर्म प्रार्थना सभेचे आयोजन केले जाते. महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयात झुणका भाकरीचे स्नेहभोजन दिले जाते व राष्ट्रीय गीत गायनाने गांधीजींचे भजने सादर केली जातात. या ऐतिहासिक व वैचारिक वारशाला शासन मान्यता मिळावी या उद्देशाने ३० जानेवारीला महात्माजींच्या शहीद दिनी गांधीग्राम येथे महत्व पूर्ण बैठक पार पडली.

परिसर सफाई करून गांधीजींच्या पुतळ्यास सुतमाला व पुष्प अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष बबनराव कानकिरड, माजी जिल्हा परिषद सदस्य भाई प्रदीप देशमुख, हरिपाठ मंडळाचे गणेशराव अढाऊ, सरपंच शरद ठाकरे,सुखदेवराव अढाऊ, विजय मोडक, प्रकाश काठोळे, विवेक मेतकर, गणेश मांजरे, डॉ. अतुल काठोळे, प्राचार्य प्रफुल डोंगरे, विश्वास काठोळे,सुभाष ठाकरे, संजय मांजरे, प्रा. डॉ. विजय चव्हाण, प्रा. जगन्नाथ बरडे, अनिल राऊत,प्रा.पूजा ठाकरे, प्रा.मोक्षदा इंगोले यांच्यासह पंचक्रोशीतील सर्वोदयी कार्यकर्ते, ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## विद्युत रोहित्राची केबल जळाली, महावितरण झोपले!

**–थार शेतशिवारातील शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान**
**– अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देण्यात धन्यता**

■तेल्हारा,दि.८ (प्रतिनिधी)■

तेल्हारा तालुक्यातील ग्रामपंचायत थार शेतशिवारात एमआयडीसी अंतर्गत येणारे विद्युत रोहित्र गेल्या अनेक दिवसांपासून उघड्यावर असून त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या रोहित्राची मुख्य केबल जळाल्याने संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा पूर्णतः खंडित झाला असून शेतकरी अक्षरशः अंधारात ढकलले गेले आहेत.या रोहित्रावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांनी गहू, हरभरा, कांदा, भुईमूग आदी पिकांची लागवड केली आहे. मात्र वीजपुरवठा बंद असल्याने पिकांना पाणी देता येत नसून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. मेहनतीचा घाम मातीत मिसळत असताना जबाबदार अधिकारी मात्र बेफिकीर असल्याचा संतप्त आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयाशी वारंवार संपर्क साधला. मात्र दुरुस्ती करण्याऐवजी संबंधित कर्मचाऱ्यांकडून ङ्गआज येतो, उद्या येतोङ्ख अशी उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक सुरू असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.रोहित्र उघड्यावर ठेवून सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केल्यामुळे मोठ्या अपघाताचीही शक्यता नाकारता येत नाही.

तरीसुद्धा महावितरणचे अधिकारी व कर्मचारी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे.तात्काळ जळालेली केबल बदलून रोहित्र दुरुस्त करावे व वीजपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे.

## यात्रेमधून मोटरसायकल गेली चोरीला

पातूर : दिग्रस येथील सोपीनाथ महाराज यात्रेमधून भर दिवसा मोटर सायकल चोरी पातुर तालुक्यामध्ये चोरीचे खुप मोठ्या प्रम ाणात वाढ झाली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची नागरिक मागणी करत आहेत . ता प्र पातुर चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेले ग्राम डिग्रस येथे सोपीनाथ महाराज यांचे दर्शनाकरिता देऊळगाव येथील संजय विश्वनाथ बराटे वय ४७ वर्ष हे गेले असता यांनी त्यांची एम एच ३० बी एम ५८ १२ क्रमांकाची मोटर सायकल शुक्रवार दिनांक ६ /२ २०२६ ला संध्याकाळी चारच्या सुमारास मंदिराजवळच लागून असलेले मंगल कार्याच्या भिंतीजवळ लावून दर्शनासाठी गेले असता दर्शन करून परत आल्यानंतर त्यांना त्यांची लावलेल्या जागी मोटरसायकल दिसली नसल्यामुळे त्यांनी मोटरसायकलचा शोध घेतला मात्र गाडी कुठेच मिळून आली नाही.

## भारतीय शास्त्रीय संगीताच्या परंपरेचा आणि घराण्यांच्या सौंदर्याचा अविस्मरणीय अनुभव



■अकोला,दि.८ (प्रतिनिधी)■

सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने चजण अंतर्गत नुकतीच संगीत विषयक कार्यशाळा संपन्न झाली . याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माननीय श्री राधेश्यामजी मोदी हे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून पंडित हेमंत पेंडसे (पुणे) हे लाभले. या कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ .नीरज लांडे, प्रा डॉ. गोविंद एललकार (संगीत विभाग प्रमुख) प्रा डॉ हर्षवर्धन मानकर (संगीत विभाग प्रमुख) मंचावर उपस्थित होते.भारतीय शास्त्रीय संगीत परंपरा आणि घराण्याचे सौंदर्यशास्त्र या विषयावर मार्गदर्शन करताना पंडित हेमंत पेंडसे यांनी घराण्याबद्दल माहिती तसेच राग दुर्गा भैरव, काफी या रागातील झपतालातील बंदिशी सादर केल्या त्याचप्रमाणे पिलू रागातील ठुमरी सादर करून विद्यार्थ्यांनी केलेल्या विनंतीवरून अनेक रागाची उकल करून दिली. सरते शेवटी मंगल गुजरी आणि भैरवी यांचे मिश्रण असलेले एक काव्य सादर केले. हार्मोनियमची उत्कृष्ट साथ महाविद्यालयाचा विद्यार्थी शिवम शर्मा याने तर तबल्याची उत्कृष्ट साथ निनाद चतारे याने केली. तब्बल अडीच तास चाललेल्या या कार्यशाळेमध्ये श्रोत्यांनी अनेक प्रश्न विचारून समाधान करून घेतले... या कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन डॉ. नाना भडके यांनी केले तर पहिल्या सत्राचे आभार प्रदर्शन प्रा .डॉ. शिरीष कडू यांनी केले तसेच दुसऱ्या सत्राचे आभार प्रदर्शन डॉ. वनिता भोपत यांनी केले . कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता प्रा. डॉ. सोपान वतारे, प्रा. डॉ .विशाल कोरडे , प्रा डॉ. नेत्रा मानकर , प्रा. अनिरुद्ध दळवी , प्रा. शुभम नारे, प्रा. रागिनी खोडवे , प्रा. प्रज्ञा मेश्राम आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

## तेल्हारा मंडळातील केळी उत्पादक शेतकऱ्यांचा संताप

### विमा भरपाई मिळणेसाठी कृषी आयुक्तांना निवेदन

■तेल्हारा,दि.८ (प्रतिनिधी)■

तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. हवामान बदलामुळे (अतिवृष्टी, गारपीट, उच्च तापमान) केळी पिकाचे मोठे नुकसान झाल्यानंतरही संबंधित विमा कंपनीकडून मंजूर झालेली नुकसान भरपाईची रक्कम अद्याप शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली नाही. स्वराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत डिक्कर यांनी कृषी आयुक्तालय, पुणे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तेल्हारा मंडळातील अनेक शेतकऱ्यांनी हवामान आधारीत फळपीक विमा योजना अंतर्गत केळी पिकाचा विमा उतरवला होता. नुकसान झाल्यानंतर पोर्टलवर मंजुरी मिळाली आणि माहिती अपलोड केली गेली.

परंतु फेब्रुवारी २०२६ पर्यंतही ही रक्कम बँक खात्यात जमा झालेली नाही. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणी येत असून, लागवडीसाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते, खर्च भागवणे कठीण झाले आहे. विमा कंपनीकडून विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे. डिक्कर यांनी निवेदनात म्हटले आहे की, मंजूर रकमेची यादी/स्टेटस तपासून तात्काळ बँक खात्यात रक्कम वितरित करावी. अन्यथा विमा कंपनीला निर्देश द्यावेत. जर लवकरात लवकर भरपाई मिळाली नाही तर शेतकरी आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

अकोला जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकरी गेल्या काही वर्षांपासून पीक विमा विलंब, कमी भरपाई किंवा प्रक्रियागत अडथळ्यांमुळे त्रस्त आहेत. तेल्हारा तालुक्यातील अडगाव, हिवरखेड, माळेगाव बाजार आदी भागातील शेतकरी या प्रकरणी सतर्क झाले असून, लवकर न्याय मिळावा अशी मागणी करत आहेत. कृषी विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अकोला महानगरपालिकेच्या मनपा शाळांतील लीडर माता कार्यशाळा व शिक्षक शिक्षण परिषद संपन्न

■अकोला,दि.८ (प्रतिनिधी)■





मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या निर्देशानुसार तसेच उपायुक्त विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिक्षणाधिकारी हरिशचंद्र इटकर यांच्या नियोजनात अकोला महानगरपालिका अधिनस्त शाळांमध्ये कार्यरत लीडर माता–पालकांची कार्यशाळा तसेच मुख्याध्यापक व शिक्षकांची शिक्षण परिषद अकोला येथील डाबकी रोडवरील भिरड मंगल कार्यालय येथे यशस्वीरित्या पार पडली.

सकाळी १० ते १२.३० या वेळेत मनपा शाळांमधील लीडर माता–पालकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यानंतर अकोला महानगरपालिकेच्या ३१ शाळांतील कार्यरत मुख्याध्यापक व शिक्षकांची शिक्षण परिषद घेण्यात आली. या कार्यक्रमास निपुण महाराष्ट्र राज्य समन्वयक म्हणून योगेश कोळसे, गणेश पाटील, कृष्णा पवार, सोमनाथ ठोंबरे, तौफिक सय्यद तसेच अमरावती विभागीय समन्वयक वैभव निमळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.सदर दोन्ही कार्यक्रम शिक्षणाधिकारी श्री हरिश्चंद्र इटकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समग्र शिक्षा अभियानाचे गट सम न्वयक हबीबूर रहमान यांनी केले.मार्गदर्शनपर भाषणे श्रीमती लीना रामटेके, वैशाली शेंडे, मोहम्मद अब्दुल अजीज (मुख्याध्यापक), राजू भिरड (मुख्याध्यापक) तसेच शिक्षणाधिकारी हरिशचंद्र इटकर यांनी केली. या उपक्रम ात सुमारे २५० लीडर माता–पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला, तर मनपा शाळांतील २०० शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली शेंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन लीना रामटेके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समग्र शिक्षा अभियानाचे गंगाधर शिंदे, सुप्रीत निंबाळकर, कविता शर्मा अंजीकर, शेलेकर, मुख्याध्यापक राजू अवधूत यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी केंद्रप्रमुख म्हणून राजू भिरड, मनोज बोचरे, राजू अवधूत, मोहम्मद अब्दुल अजीज, हबीबूर रहमान यांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या लीडर माता–पालकांचा शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित होते.

## धाबेकर नगराच्या कीर्तन उत्सवाची निघाली भव्य दिंडी शोभायात्रा

■अकोला,दि.८ (प्रतिनिधी)■



खडकी परिसरातील धाबेकर नगरातील संत गजानन महाराज मंदिरात संत गजानन महाराज प्रगटदिन महोत्सव निमित्त सुरू असलेल्या श्रीमद भागवत व कीर्तन उत्सवाची शनिवारी भव्य दिंडी शोभायात्रा काढण्यात आली.भागवतकार हभप मंगेश महाराज वराडे यांच्या उपस्थितीत आयोजित या दिंडी शोभायात्रे चा प्रारंभ संत गजानन महाराज मंदिरा पासून करण्यात आला.या शोभायात्रेत संत गजानन महाराज यांची पालकी,देगाव येथील वारकरी दिंडी पथक व शेकडो महिला पुरुष सहभागी झाले होते. धाबेकर नगर परिसरातील रस्त्यावर व आपापल्या घरासम ोर महिलांनी आकर्षक रांगोळ्या साकारत पालकीचे पूजन केले.रस्त्यात अनेक कुटुंब व मंडळांनी पिण्याच्या पाणी व बिस्कुटांची व्यवस्था केली होती. परिसरातील अनेक वस्त्यात भ्रमण करीत या शोभायात्राचे परत कथास्थळी आगमन होऊन समापन करण्यात आले.दिंडी शोभायात्राच्या सफलतेसाठी संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट धाबेकर नगर व खडकी बु. च्या समस्त नागरिकांनी मेहनत घेतली.

### निधन वार्ता

**नलिनी गीते**



माजी नगराध्यक्ष तथा भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मा. जयश्रीताई पुंडकर यांच्या मातोश्री, श्रीमती नलिनी त्रंबकराव गीते (वय ७७) यांचे दिनांक ६ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचेवर भंडारज येथे ७ फेब्रुवारी ला अंतिम संस्कार करण्यात आला.यांचा पश्च्यात एक मुलगा, तिन मुली, सुन, नातवंड असा आप्त परिवार आहे.

# शालेय स्पोर्ट्स डान्स क्रीडा स्पर्धांच्या निकालात गुणी विद्यार्थ्यांवर अन्याय

## अकोला क्रिडा विभागाच्या पक्षपाताच्या चौकशीची पालकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

■अकोला,दि.८ (प्रतिनिधी)■

अकोला सांस्कृतिक चळवळीचा जिल्हा म्हणून सुद्धा ओळखला जातो. या ठिकाणी अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांची आयोजनं केली जातात.त्यातून क्रिडापटू आणि कलाकारांना संधी देऊन प्रोत्साहन दिल्या जाते .परंतू आयोजन करणाऱ्या जिल्हा क्रिडा विभागातील परीक्षकांकडूनच कर्तव्याची बांधिलकी विसरून स्वतःच्या परिचयातील विद्यार्थ्यांना वशिलेबाजीने पुढे आणण्यात आले.यामुळे अग्रेसर ठरलेल्या मेहनती क्रिडापटू आणि कलाकारांवर अन्याय करण्याची संतापजनक घटना क्रिडा विभागाच्या स्पर्धांमध्ये घडली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय स्पोर्ट्स डान्स व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सहभागी स्पर्धकांना पक्षपाती निर्णयाला समोरे जावे लागले. त्यांच्या मेहनतीला जाणीवपूर्वक डावलून कर्तव्याची प्रतारणा करीत राष्ट्राच्या भावी आधारस्तंभावर आघात करून त्यांचे मनोबल खच्ची करण्याचे काम अकोला क्रिडा विभागाकडून झाले आहे.

### लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाकडून चौकशीची मागणी

या स्पर्धांविषयी सर्व शाळांना जाणीवपूर्वक माहिती देण्यात आली नव्हती. ज्या शाळा सहभागी झाल्या त्या स्पर्धकांच्या सादरीकरणानंतर ठराविक एकाच खाजगी शिकवण्यातील विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांक देण्यात आलेत. या स्पर्धेमध्ये जिल्हास्तरीय सादरीकरण करणाऱ्या मुलांच्या परिक्षणासाठी ह्या खाजगी शिक्षिकाच परीक्षक म्हणून होत्या. त्यामुळे त्यांनी आपल्या खाजगी शिकवण्यातील स्पर्धकांनाच प्रथम क्रमांक देऊन बाकी विद्यार्थ्यावर शिक्षकी पेशाला न शोभणारा अन्याय केलेला आहे. याबाबतचे विभागीय स्तरावर त्वरीत निर्णय न देता संध्याकाळी निर्णय कळवू असे सांगण्यात आले होते. जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये प्रथम आणि द्वितीय क्रमांकच सहभागी करण्यात येतील असे सुध्दा जाहिर केले होते.परंतु पूर्व कल्पना न देता प्रत्यक्षात समोर आलेल्या यादीमध्ये शेवटच्या क्षणाला तृतीय क्रमांक असणाऱ्या विद्यार्थ्यांची नावं होती.जीव तोडून मेहनत करणाऱ्या स्पर्धक पाल्यांना मिळालेल्या या अमानविय वागणुकीमुळे पालकवर्ग संतप्त झालेला आहे.यामुळे अशा वशीलबाजीसाठी स्पर्धांमध्ये अग्रेसर विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक ठरलेले राज्यस्तरासाठी दिले गेलेले निर्णय स्पर्धक आणि पालक यांना मान्य नाहीत.

हा प्रकार क्रीडा विभागाच्या कर्तव्य,प्रामाणिकता आणि नि:पक्षपातीवर या खाजगी शिक्षिका मुळे प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.या सर्व बाबींना लक्षात घेता या सबंध प्रक्रियेची चौकशी व्हावी.अत्यंत मनापासून आणि मेहनतीने योग्य सादरीकरण ज्यांनी केले,त्या मुलांचे मानसिक खच्चीकरण होऊ नये यासाठी या गंभीर विषयाकडे प्राधान्याने आणि संवेदनशीलतेने लक्ष देऊन चौकशी व्हावी. राष्ट्राचे आधारस्तंभ म्हणविल्या जाणाऱ्या गुणी विद्यार्थांचे भविष्य अंध:कारमय करण्याचे षडयंत्र करणाऱ्यांवर कार्यवाही व्हावी.अशी मागणी संतप्त पालकांनी या निवेदनातून केलेली आहे.लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाने सुध्दा याबाबत चौकशी आणि कार्यवाहीची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## अकोला ब्लड बँकेचा स्थापना दिन संपन्न

**अकोला** : गत ३५ वर्षापासून रामनगर परिसरात गरजू रुग्णांसाठी रक्तपुरवठा करणाऱ्या अकोला ब्लड बँकेचा ३५ वा स्थापना दिन नुकताच संपन्न झाला. २३ जानेवारी १९९१ रोजी डॉ. रेखा अग्रवाल व कृष्णकुमार अर्थात डॉ के के अग्रवाल यांनी या ब्लड बँकेची स्थापना केली होती. सर्वप्रथम राधाकिसन प्लॉट परिसरात ही ब्लड बँक स्थापन करण्यात येऊन यानंतर सिव्हिल लाईन मध्ये ही ब्लड बँक सुरू होती. सन २०१३ पासून रामनगर येथे या ब्लड बँकेची रुग्णसेवा योग्य प्रकारे अविरतपणे सुरू आहे.या ब्लड बँकेच्या माध्यमातून कोणत्याही थेलेसेमिया व सिकलसेल रुग्णांसाठी मोफत रक्तपुरवठा करण्यात येत असून ही अखंडपणे सेवा सुरू आहे. या ब्लड बँकेमार्फत सन १९९७ पासून रक्त घटक तयार करण्याचे कार्यही सुरू असून ही प्रक्रिया खाजगी रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तपेढ्यातील पहिली प्रक्रिया आहे. यात प्लेटलेट, प्लाजमा, पॅकसेल आदी रक्ताच्या प्रक्रिया या ब्लड बँकेमार्फत करण्यात येत आहेत. सामाजिक दायित्व म्हणून अकोला ब्लड बँकेच्या माध्यमातून अनेक वेळा रक्तदान शिबिरे ही आयोजित करण्यात येत असतात.अकोला ब्लड बँकच्या या सेवाभावी कार्यामुळे अकोला ब्लड बँक ला लायन्स क्लब, अग्रवाल समाज समवेत अनेक सेवाभावी संस्था, संघटनांनी सन्मानित करून ब्लड बँकेच्या रुग्ण सेवा उपक्रमाचे स्वागत केले आहे. अन्न व औषध प्रशासनालयाकडे नोंदणीकृत असणारी या अशासकीय अकोला ब्लड बँकचे कामकाज शासकीय नियमानुसार सुरू असून ब्लड बँकेच्या या ३५ व्या वर्धापन दिवसावर ब्लड बँकेचे वैद्यकीय,सामाजिक, शैक्षणिक, व्यापार, उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

RNINO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale. Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak Local Editor - Purushottam Madhukarrao Dhole. Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023

आर.एन.आय. नोंदणी क्र. ४६९७३/१९८८ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, खामला स्केअर दुर्गा चौक, अकोला येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक, स्थानिक संपादक : पुरूषोत्तम मधुकरराव ढोले. फोन: ९८८१४८९४७९ (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील)

# कॅलिडोस्कोप

## आता घरच्या घरी ड्रायक्लीन!





'व्हर्लपूल कंपनी'ने भारतीय बाजारात वॉशिंग मशीनची खास एक्सपर्ट केअर सीरिज लाँच केली आहे. यात ओझोन फ्रेश एअर तंत्रज्ञान आहे. कंपनीच्या मते हे मशीन पाणी किंवा डिटर्जंटशिवाय कपडे स्वच्छ करू शकते. काही कपडे पूर्णपणे धुण्याची आवश्यकता नसते. काही काळ परिधान केलेल्या कपड्यांना ओझोन तंत्रज्ञान पाण्याशिवाय पुन्हा ताजे बनवते. यासाठी मशीनमध्ये अंगभूत ओझोनायझर आहे. ते ऑक्सिजनचे ओझोनमध्ये रूपांतर करते. हा ओझोन ड्रममध्ये सोडला जातो. त्यामुळे गंध आणि जीवाणू दूर राहतात. 'ड्राय-क्लीन फॅब्रिक'वर या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असल्याचे कंपनीचे म्हणणे आहे. चाचणीदरम्यान कोणतेही आकुंचन आलेले नाही किंवा त्यांचा रंग फिकट झाला नाही. कंपनीच्या मते कपडे मशीनमधून काढून थेट परिधान केले जाऊ शकतात. याशिवाय या मशीनमध्ये तुम्ही नियमित कपडेदेखील धुवू शकता.

'व्हर्लपूल एक्सपर्ट केअर रेंज'मध्ये स्टीम वॉश तंत्रज्ञान देखील आहे. यात सिक्सथ सेन्स तंत्रज्ञान आहे. ते लोड आणि फॅब्रिकच्या आधारे ड्रमची हालचाल कस्टमाईज करते. यात कमी पाण्याच्या दाबासाठी शून्य दाब भरण तंत्रज्ञान आहे. मशीन १४०० आरपीएम वर फिरते.

## डोळे हे जुलमी गडे

डोळे हा माणसाच्या शरीरातला अत्यंत महत्त्वाचा आणि नाजूक अवयव. दृष्टी नसेल तर सृष्टी पाहता येत नाही. परमेश्वराने माणसाच्या शरीराची रचना करताना प्रत्येक गोष्टीचा नीट विचार केला आहे. आपल्या सर्व अवयवांचं कार्य नित्यनेमाने सुरू असतं. डोळेही सातत्याने कार्यरत असतात. अशा या डोळ्यांबद्दलची रंजक माहिती जाणून घेऊया.





- डोळ्यांच्या विकासाची सुरुवात तब्बल ५५० दशलक्ष वर्षांपूर्वी झाल्याचं सांगितलं जातं. गर्भधारणा होऊन दोन आठवडे उलटल्यानंतर डोळ्यांचा विकास होऊ लागतो.
- भुवयांमुळे कपाळावरचा घाम डोळ्यात जात नाही तर पापण्यांमुळे धूळ आणि घाणीपासून या नाजूक अवयवाचं रक्षण होतं.
- डोळ्यांची रचना अनोख्या पद्धतीने करण्यात आली असून चेहऱ्यावरच्या खोबणीत ते बसवण्यात आले आहेत.
- जन्मापासून मृत्यूपर्यंत बुब्बुळांच्या आकारात कोणताही बदल होत नसला तरी नाक आणि कानांचा आकार मात्र बदलत राहतो.
- माणसाच्या डोळ्याचं वजन एक औंसापेक्षाही कमी असतं.
- डोळ्यांना झालेली जखम खूप लवकर बरी होते.
- दृष्टीशी संबंधित ८० टक्के दोष टाळता येतात किंवा पूर्णपणे बरे होतात.
- मेंदूनंतर डोळा हा शरीराचा सर्वात गुंतागुंतीचा अवयव आहे.
- जगभरातल्या ५५ टक्के लोकसंख्येच्या डोळ्यांचा रंग भूरा आहे.
- जास्त वेळ वाचन केल्याने किंवा सातत्याने कॉम्प्युटर, स्मार्टफोनच्या स्क्रीनवर नजर खिळवल्याने डोळ्यांना थकवा येतो.

## गुलाबी कागदातच का?

भारतामध्ये पिढ्यान् पिढ्या एक गोष्ट अगदी हमखास पाहायला मिळते. ती म्हणजे सोनं किंवा चांदी खरेदी करताना ते गुलाबी कागदात गुंडाळून देणं. लहान शहरांमधील पारंपरिक सोनार असोत किंवा मोठ्या ब्रँडेड ज्वेलरी शोरूम्स, ही परंपरा आजही तशीच सुरू आहे. बहुतांश ग्राहक याकडे केवळ सवय किंवा साधी पॅकिंग पद्धत म्हणून पाहतात.



या गुलाबी कागदामागे शास्त्र, मानसशास्त्र, सुरक्षितता आणि धार्मिक श्रद्धा यांचा अनोखा संगम दडलेला आहे. एखादा सराफ सोन्याची अंगठी, हार किंवा बांगडी फिकट गुलाबी कागदात ठेवून दाखवतो, तेव्हा तो नकळतपणे ग्राहकाच्या डोळ्यांवर आणि मेंदूवर परिणाम करत असतो. तज्ज्ञांच्या मते, हा हलका गुलाबी शेड सोन्याच्या पिवळ्या झगमगाटाला संतुलित करतो. त्यामुळे सोनं फारच पिवळट किंवा भडक न दिसता अधिक रॉयल, क्लासी आणि महागडे वाटते. याच कारणामुळे एखादा दागिना गुलाबी कागदात पाहिल्यावर अधिक आकर्षक भासतो.

मानसशास्त्रज्ञ सांगतात, गुलाबी रंग पाहणाऱ्याच्या मनात 'नवीन, शुद्ध आणि सौम्य' असा भाव निर्माण करतो. त्यामुळे दागिना पाहताना ग्राहकाला एक वेगळाच समाधानाचा आणि विश्वासाचा अनुभव मिळतो. हा गुलाबी कागद फक्त दिसायला सुंदर नसतो, तर तो अत्यंत मऊ असतो. त्यामुळे दागिन्यांची ने-आण करताना त्यावर ओरखडे पडण्याची शक्यता कमी होते. विशेषतः सोनं आणि चांदीसारख्या मऊ धातूंसाठी ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

## अजब चोर!

कर्नाटकची राजधानी बेंगळुरूमधील 'इलेक्ट्रॉनिक सिटी' परिसरात चोरीचा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी निवासी इमारतींमधून महिलांचे अंतर्वस्त्रे चोरणाऱ्या २३ वर्षीय तरुणाला अटक केली आहे. आरोपी पुरूष महिलांची अंतर्वस्त्रे उचलायचा, ते घालायचा आणि नंतर फोटो काढायचा. त्याने छतावर आणि अंगणात वाळत घातलेली महिलांची अंतर्वस्त्रे चोरली.

एक पुरूष छतावर आणि अंगणात सुकविण्यासाठी लटकवलेल्या महिलांच्या अंतर्वस्त्रांना वारंवार लक्ष्य करत आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. तक्रार मिळाल्यानंतर, परिसरात गस्त घालणाऱ्या पोलिसांनी तात्काळ कारवाई केली आणि माहितीची पुष्टी करण्यासाठी घटनास्थळी गेले. सीसीटीव्ही फुटेजदेखील तपासण्यात आले. त्यात संशयिताच्या हालचाली टिपल्या गेल्या. सीसीटीव्ही फुटेज आणि स्थानिक रहिवाशांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेतले.

हा संशयित केरळचा रहिवासी आहे. प्राथमिक तपासात आरोपीच्या मोबाईल फोनमध्ये आढळलेल्या छायाचित्रांमध्ये तो महिलांची अंतर्वस्त्रे परिधान केलेला दिसतो. पोलिसांनी आरोपीच्या घराची झडती घेतली. तिथे महिलांच्या अंतर्वस्त्रांचा मोठा संग्रह जप्त करण्यात आला.



## कोट्यधीश भिकारी



भिकारीमुक्त शहर बनवण्यासाठी इंदूरमध्ये सुरू केलेल्या मोहिमेदरम्यान सराफा परिसरात नियमितपणे भीक मागणाऱ्या मांगीलाल या कुष्ठरोग्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर एका आर्थिक नाट्यमय घटनेचा उलगडा झाला.

वर्षानुवर्षे, मांगीलालने मागता भीक मागण्याची कला आत्मसात केली होती. तो कधीही भीक मागत नसे. तो आपल्या चाकं लावलेल्या लाकडी फळीवर बसून राहायचा. लोक स्वतःहूनच त्याला पैसे देत असत. केवळ भीक मागण्यातून त्याची दररोजची कमाई ४०० ते ५०० रुपयांच्या दरम्यान होती; पण तपासकर्त्यांच्या मते, खरा धंदा अंधार पडल्यानंतर सुरू व्हायचा. चौकशीदरम्यान, मांगीलालने कबूल केले, की भीक मागून मिळालेले पैसे तो जगण्यासाठी खर्च करत नव्हता, तर ते थेट सराफा बाजारात गुंतवत होता. तो स्थानिक व्यापाऱ्यांना एक दिवसासाठी किंवा आठवड्यासाठी रोख रक्कम कर्ज म्हणून देत असे आणि दररोज संध्याकाळी स्वतः व्याज वसूल करत असे.


अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार, त्याने ४ ते ५ लाख रुपये कर्ज दिले असून, व्याजासह दररोज १ ते २ हजार रुपये कमावत होता. गरीब वाटणाऱ्या मांगीलालची संपत्ती चक्रावून टाकणारी आहे. शहराच्या प्रमुख भागांमध्ये त्याच्या मालकीची तीन घरे आहेत. त्यात एक तीन मजली इमारत असून आणि इतर दोन एक मजली घरे आहेत. शिवाय त्याच्याकडे दररोज भाड्याने दिल्या जाणाऱ्या तीन ऑटो-रिक्षा आणि एक मारुती सुझुकी डिझायर कार यांचा समावेश आहे. अनेक मालमत्तांचा मालक असूनही, त्याला त्याच्या अपंगत्वामुळे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत वन बीएचके घर मिळाले आहे. मंगिलालला आता उज्जैन येथील सेवाधाम आश्रमात हलवण्यात आले आहे. त्याच्या बँक खात्यांची आणि मालमत्तांची चौकशी सुरू आहे आणि त्याच्याकडून पैसे घेतलेल्या व्यापाऱ्यांचीही चौकशी केली जाणार आहे. मंगिलाल २०२१-२२ पासून भीक मागत आहे. त्याला सध्या एका निवारागृहात ठेवण्यात आले आहे. त्याच्याबद्दल अधिक माहिती गोळा केली जात आहे, आणि एक संपूर्ण अहवाल तयार करून जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आला आहे. पुढील निर्देशानुसार त्यावर कारवाई केली जाईल. या प्रकरणामुळे फेब्रुवारी २०२४ मध्ये सुरू झालेल्या इंदूरच्या भिकारीविरोधी मोहिमेत एक अनपेक्षित अध्याय जोडला गेला आहे. एका अधिकृत सर्वेक्षणानुसार शहरात सुमारे ६५०० भिकारी असल्याचे आढळून आले आहे. आतापर्यंत, ४५०० जणांनी समुपदेशनानंतर भीक मागणे सोडले आहे. १६०० जणांची सुटका करून त्यांना पुनर्वसन केंद्रांमध्ये पाठवण्यात आले आहे, आणि १७२ मुलांना शाळांमध्ये दाखल करण्यात आले आहे.

## स्टंटबाज ॲरॉन



व्हिलचेअरवर दिवस काढणाऱ्या व्यक्तींबद्दल आपल्याला सहानुभूती वाटते. अपंगत्वामुळे बऱ्याच जणांना आयुष्यभर व्हिलचेअर जवळ करावी लागते. पण या परिस्थितीचा फारसा बाऊ न करणारे लोकही असतात. ॲरॉन फोथरिंगम अशांपैकीच एक. तरूण मंडळी मोटरसायकलचे स्टंट करतात. ट्रेनच्या दारात उभे राहणारेही चर्चेत असतात. पण ॲरॉन व्हिलचेअरवर बसून स्टंट करतो. तो व्हिलचेअर ३६० अंशात अगदी सहजपणे फिरवतो. अशा कसरती दाखवून त्याने बऱ्याच स्पर्धांमध्ये विजेतेपदं पटकावली आहेत. या धाडसी मुलाचे कारनामे बघून आपण आश्चर्यचकित होतो. त्याचं कौतुक करण्यासाठी शब्दही अपुरे पडतात. ॲरॉनचा हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो. पाठीच्या कण्याशी संबंधित दोष घेऊन जन्माला आलेल्या ॲरॉनने जिद्दीने या अपंगत्त्वावर मात केली. सुरूवातीला तो कुबड्या वापरत असे. त्याने वयाच्या आठव्या वर्षापासून व्हिलचेअर वापरायला सुरूवात केली. त्याचा भाऊ बीएमएक्सवर स्टंटबाजी करत असे. त्याच्याकडूनच ॲरॉनला प्रेरणा मिळाली. बीएमएक्स ट्रॅकचा वापर करायला सुरूवात केल्यानंतर त्याने कधीही मागे वळून पाहिलं नाही. त्याने स्टंटबाजीच्या बऱ्याच स्पर्धा गाजवल्या. तो रिॲलिटी शोमध्येही सहभागी झाला होता. त्याने एका मालिकेतही काम केलं. ॲरॉनच्या नावे बरेच विक्रम नोंदवले गेले आहेत.

## जमिनीखालचं गाव



जगभरात अनेक चित्रविचित्र ठिकाणं आहेत. त्यांच्याबद्दल जाणून घेतल्यावर आपले डोळे विस्फारतात. काही ठिकाणं निसर्गाचा चमत्कार असतात तर काही मानवनिर्मित. अमेरिकेतलं असंच एक गाव पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरलं आहे. ते जमिनीखाली वसलं आहे. आपण भुयारी रेल्वे, मेट्रोबद्दल ऐकून आहोत. परदेशात अशा रेल्वे कार्यरत आहेत. पण संपूर्ण गावच जमिनीच्या खाली असणं हा प्रकार भन्नाटच म्हटला पाहिजे. 'सुपाई' असं या जमिनीखालच्या गावाचं नाव! ते जमिनीपासून तब्बल तीन हजार फूट खोल वसलं आहे. जगभरातून दरवर्षी जवळपास ५५ लाख लोक 'सुपाई'ला भेट द्यायला येतात. लोकसंख्या खूप कमी असली तरी पर्यटकांमुळे ते कायम गजबजलेलं असतं. अमेरिकेतल्या 'ग्रँड कॅनियन' जवळच्या हवासू भागातल्या खोल दरीत 'सुपाई' वसलं आहे. या ठिकाणी अवघे २०८ लोक राहतात. अमेरिकेतले मूळ निवासी असणारे 'रेड इंडियन्स' इथले नागरिक आहेत. अमेरिकेसारख्या जागतिक महासत्ता असणाऱ्या देशातलं हे गाव आधुनिक सोयीसुविधांपासून मात्र वंचित आहे. इथे येण्यासाठी बरीच पायपीट करावी लागते किंवा खेचरावर बसून प्रवास करावा लागतो. इकडे एखाद-दुसरं विमानच येतं. अशा या गावात जाण्यासाठी अंगी धाडस आणि इच्छाशक्ती असायला हवी.

## नोकरी अट्टल चोरांसाठी

सध्याच्या काळात नोकरी मिळणं अत्यंत कठीण झालं आहे. भरतीची जाहिरात पाहिली की तरुण-तरुणी लगबगीने अर्ज करतात. प्रत्येकजण आपलं कौशल्य, आवड आणि शिक्षण यांचा विचार करून अर्ज करण्याचा निर्णय घेतो. अशा वेळी वर्तमानपत्रातल्या जॉब्स कॉलममध्ये शोध घेताना एखाद्या भन्नाट ऑफरवर तुमची नजर पडली तर? ही ऑफर साधीसुधी नाही तर चक्क चोरीची ऑफर आहे. कोणीही शहाणा माणूस सफाईदार चोरांना नोकरी देणार नाही. याबाबतची जाहिरातही कुठे आढळणार नाही. पण लंडनमधल्या एका कंपनीने अशी ऑफर दिली आहे. गंमत म्हणजे नोकरीच्या ठिकाणीच चोरी करायची आहे. चोरी केल्यानंतर प्रतितास ६४ डॉलर मानधन दिलं जाईल. साहेबाच्या देशातल्या कपड्यांच्या दुकानाच्या एका मालकीणबाईने बार्क डॉट कॉमवर ही ऑफर दिली. चोराला प्रत्येक तासाला तिच्याच दुकानात चोरी करावी लागेल, अशी अट घालण्यात आली आहे. तिने असं का बरं केलं असावं? याचं कारण म्हणजे ती दुकानातल्या चोऱ्यांमुळे खूप वैतागली आहे. विशेषत: सुटीच्या काळात दुकानातल्या वस्तू चोरीला जाण्याचं प्रमाण वाढतं. यावर उपाय म्हणून तिने अशी जाहिरात दिली. चोराने चोरी केल्यानंतर त्याच्या कामाची पद्धत जाणून घेतली जाईल आणि त्याप्रमाणे सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जातील, असं तिचं म्हणणं आहे. दुकानात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असले तरी चोरीच्या घटना घडतच आहेत. त्याचा सोक्षमोक्ष लावण्याचा तिचा प्रयत्न आहे. आता या नोकरीसाठी किती अर्ज येणार ते पहायचं!



## ...आणि लखपती झाली

भाजी आणायला गेल्यावर सहज म्हणून लॉटरीचं तिकिट काढायचं आणि लखपती व्हायचं ही कल्पनाच किती छान आहे ना! पण प्रत्यक्षात असं कधी घडू शकतं का? अमेरिकेतल्या मेरीलँडची रहिवासी असणाऱ्या वनिस्सा नावाच्या महिलेच्या बाबतीत मात्र असं घडलं. भाजी आणायला गेलेल्या वनिस्साने गंमत म्हणून लॉटरीचं तिकिट काढलं आणि तिचं नशीब उघडलं. झालं असं की कोबी आणायला गेलेल्या वेनिसाला रस्त्यात लॉटरीचं दुकान दिसलं. आपणही लॉटरी काढून पाहू, असं तिच्या मनात आलं. तिकिट काढून ती घरी आली. ते स्क्रॅच केल्यानंतर तिला आनंदाच्या उकळ्या फुटल्या. तिने सर्वाधिक रकमेची लॉटरी जिंकली होती. २,२५,००० डॉलर तिला मिळाले होते. ही रक्कम एखाद्या चांगल्या पर्यायात गुंतवण्याचा तिचा विचार आहे. इतकंच नाही तर तिला 'डिस्ने वर्ल्ड' फिरायचं आहे. लॉटरीच्या माध्यमातून एवढी रक्कम जिंकणारी वेनिस्सा एकमेव नाही. जुलैमध्ये एक इसमाला अशीच मोठ्या रकमेची लॉटरी लागली होती. केरळचा व्यावसायिक प्रवीण थॉमसनेही दुबई विमानतळावरच्या ड्युटी फ्री ड्रॉमधून एक दशलक्ष डॉलर जिंकले होते. अशा पद्धतीने मालामाल होण्यासाठी नशीब मात्र जोरावर असायला हवं.



# अभिनेत्री सोनाली कुलकर्णीच्या उपस्थितीने गाजला फॅशन शो

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

ॲडव्हान्टेज विदर्भ २०२६ -खासदार औद्योगिक महोत्सवांतर्गत महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या एमकेएसएस स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी यांच्यावतीने दुसऱ्या ग्रॅज्युएट फॅशन शोचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीने हा फॅशन शो गाजला.



फॅशन शोमध्ये बी.ए. फॅशन डिझाईन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींनी शाश्वत फॅशनचा संदेश देणाऱ्या या शोमध्ये एकूण सहा संकल्पनांवर आधारित डिझाईन सादर केले. टेम्पल ऑफ इंडिया अंतर्गत हातमाग महामंडळाने निःशुल्क पुरविलेल्या करवत किनार साडीवर कलाकृती साकारण्यात आल्या. दि पॅलेस पॅलेट - फोर गेट्स, वन स्टोरी या संकल्पनेत जयपूरच्या शहरद्वारावरील कलात्मक कुसर कापडांवर ब्लॉक प्रिंट व स्मॉकिंग तंत्रातून उलगडली. डेनिम रिव्होव्हनमध्ये सूर्यलक्ष्मी कॉटन मिल्सकडून निःशुल्क मिळालेल्या डिफेक्टिव्ह डेनिमवर सृजनशील डिझाईन सादर करण्यात आल्या. डेजर्ट रिदम्समध्ये बंजारा समुदायाच्या पारंपरिक काचकामाचा वापर दिसून आला. फ्लोरल व्हिस्पर मध्ये सुदामणी फाउंडेशनकडून मिळालेल्या कापडावर हाताने पेंटिंग व विणकाम करून फुलांच्या विविध छटा साकारल्या, तर रिव्ह्यू राऊंडमध्ये मागील वर्षीच्या पहिल्या बॅचच्या निवडक डिझाईनचे सादरीकरण करण्यात आले. सोनाली कुलकर्णी यांनी डेनिम रिव्होव्हन कलेक्शनचे त्यांच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये वापर करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. नितीन श्रीवास्तव, मधू सिंग आणि ध्रुव हिंगले यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

कार्यक्रमास महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे सदस्य व सॉफ्ट नागपूर व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सीए अभय कुलकर्णी, सदस्य सत्यजीत चितळे, सचिव डॉ. पी.व्ही.एस. शास्त्री, असोसिएशन ऑफ इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशीष काळे, सचिव डॉ विजयकुमार शर्मा, पंकज भोकरे, हेमंत अंबासेलकर, विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षा व प्रमुख मार्गदर्शक डॉ. मंजू हुंडेकर, मधुबाला साबू, श्रीकांत गाडगे, निधी गांधी, रोटरी वेस्ट नागपूरचे अभय गांधी व शर्मिष्ठा गांधी, हातमाग महामंडळाचे सहसंचालक गंगाधर गजभिये, रोकडे ज्वेलर्सचे राजेश रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीच्या प्रभारी प्राचार्या क्रिपा सावलानी, सहायक प्रशासकीय अधिकारी आनंद काळे, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, पालकवर्ग तसेच फॅशन डिझाईन क्षेत्रातील तज्ज्ञांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अश्विनी चकोले, शरायू बत्रा, नियती पाठक, डॉ. प्रवीण गेडाम, स्वणीर्मा बाराहाते, गायत्री मांजरखेडे, तेजराम वहिले, कृष्णा सातारकर, अश्विनी बुजोणे, मेघा ठाकूर तसेच बी.ए. फॅशन डिझाईनच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील सर्व विद्यार्थिनींचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मुख्याध्यापकाचा विद्यार्थिनीवर कारमध्ये अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ८ :

शिक्षण क्षेत्राला आणि गुरू-शिष्याच्या पवित्र नात्याला काळीमा फासणारी संतापजनक घटना घाटंजी तालुक्यातील एका जिल्हा परिषद शाळेत उघडकीस आली आहे. शाळेत सातव्या इयत्तेत शिकणाऱ्या एका १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीवर स्वतः मुख्याध्यापकानेच लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

ज्याने संस्कार करायचे, तोच भक्षक बनल्याने पालकांमध्ये संतापाचा उद्रेक झाला आहे. या नराधम मुख्याध्यापकाला पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने त्याला २१ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. किशोर उत्तमराव मालवीय (४३, रा. चांदूरेनगर, यवतमाळ) असे या विकृत मुख्याध्यापकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा नराधम गेल्या वर्षभरापासून विद्यार्थिनिशी दुष्कृत्य करत होता. त्याने १ मे २०२५ रोजी शाळेच्या डिजिटल रूममध्ये या चिमुकलीवर पहिल्यांदा बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याची हिंमत वाढली. गुरुवारी, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास त्याने मुलीला काहीतरी आमिष दाखवून स्वतःच्या झायलो कारमध्ये बसवले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या प्रकाराने पीडित मुलगी प्रचंड घाबरली होती. अखेर तिने धीर एकवटून घरी घडलेला प्रकार आई-वडिलांना सांगितला.

आपल्या पोटच्या गोळ्यावर झालेला अत्याचार ऐकून वडिलांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता पीडितेसह घाटंजी पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दाखल केली. तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये आणि पोक्सो अन्वये गुन्हे दाखल केले. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी शनिवारी रात्रीच आरोपी मुख्याध्यापकाला अटक केली. ज्या कारमध्ये मुख्याध्यापकाने दुष्कृत्य केले, ती कारही पोलिसांनी जप्त केली आहे.

आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला २१ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन राठोड करीत आहेत. या घटनेमुळे तालुक्यात संतापाची लाट उसळली असून, आरोपी नराधम शिक्षकाला फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी पालकांनी लावून धरली आहे. आरोपी मुख्याध्यापकाची वागणूक आणि गुन्ह्याची पद्धत पाहता, त्याने शाळेतील इतर विद्यार्थिनींसोबतही असे गैरकृत्य केले असण्याची दाट शक्यता आहे.

## गडचिरोलीत ११११ किलो नाचणी शिरा तयार करून

# विष्णू मनोहर यांचा जागतिक विक्रम

■ वृत्तसंस्था, गडचिरोली, दि. ८ :

कृषी संस्कृती आणि स्थानिक उत्पादनांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने आयोजित कोया कृषी कुंभ २०२६ या भव्य कृषी महोत्सवात आज एक ऐतिहासिक क्षण साकार झाला.



प्रसिद्ध आचारी विष्णु मनोहर यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ११११ किलो नाचणीचा शिरा तयार करून जागतिक विक्रम प्रस्थापित करण्यात आला. या उपक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यातील भरडधान्ये, विशेषतः नाचणी पिकाचे पोषणमूल्य आणि महत्त्व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाले.

आदिवासी व दुर्गम भागातील पारंपरिक शेती आणि स्थानिक कृषी उत्पादनांना जागतिक ओळख मिळावी, हा या विक्रमामागील मुख्य हेतू होता. नाचणीपासून तयार करण्यात आलेल्या या महाकाय शिऱ्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तसेच वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडियामध्ये घेण्यात आली आहे. या विक्रमासाठी वापरण्यात आलेली नाचणी ही गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून शाश्वत पद्धतीने उत्पादित करण्यात आली होती. या ऐतिहासिक उपक्रमाच्या तयारीसाठी मागील १५ दिवसांपासून विशेष नियोजन करण्यात आले होते. शिरा तयार करताना पाणी, गूळ, तूप, चारोळी, ड्रायफ्रुट्स आदी पारंपरिक व पौष्टिक घटकांचा वापर करण्यात आला. या संपूर्ण प्रक्रियेची प्रत्यक्ष उपस्थित राहून रेकॉर्ड संस्थांच्या प्रतिनिधींनी काटेकोर तपासणी केली. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल, सहायक जिल्हाधिकारी एम. अरूण यांच्यासह जिल्ह्यातील विविध शासकीय अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी, शेतकरी, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामविकासात पंचसूत्रीवर भर आवश्यक : बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

ग्राम विकासात शिक्षण,आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा व दिवाबत्ती ही पंचसूत्री अत्यंत महत्त्वाची आहे. गावपातळीवरील ग्रामविस्तार अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात या पंचसूत्रीवर लोकभावना त त्यांच्या गरजा लक्षात घेवून विकासाचा आराखडा करून त्यानुसार मागणी वजा प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. उमरेड येथे आयोजित पंचायत समिती आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी खासदार श्याम कुमार बर्वे, आमदार संजय मेश्राम, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी आमदार सुधीर पारवे, राजू पारवे, नगर पंचायतीच्या नगराध्यक्ष कारू यावेळी उपस्थित होते.




शासकीय जमिनीवर जमिनीवर अनेक वर्षांपासून असलेल्या जागांना शासनाच्या नियमांप्रमाने नियमानुकूल करून पात्र अतिक्रमण धारकांना त्यांच्या हस्ते पट्टे वाटप करण्यात आले. तसेच नागरिकांकडून तक्रारी व निवेदन स्वीकारण्यात आली. या निवेदनावर बैठक घेऊन यातील नियामकुल प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

या बैठकीत सरपंचांनी आपापल्या ग्रामपंचायत क्षेत्रात राहिलेल्या विकास कामांबाबत माहिती दिली. उमरेड, भिवापूर, कुही या तिन्ही तालुक्यातील सर्व कामांसाठी डीपीसी मधून निधी उपलब्ध करून देण्याचे त्यांनी सांगितले.

घरकुल योजनेसाठी ग्रामपंचायतींना वाळू उपलब्ध करून देण्यात येईल. सोबतच घरकुलधारकांना पाच ब्रास रेती उपलब्ध करून देण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले. सर्व घरकुलधारकांची एकत्रित मागणी ग्रामपंचायतीने सादर केल्यास याचे तत्काळ नियोजन करून वाळू उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

## पदमजी पेपर प्रोडक्ट्सची नफा क्षमता १८ टक्क्यांवर स्थिर

लोकार्थ




पदमजी पेपर प्रॉडक्ट्स लिमिटेडने ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांच्या कालावधीसाठी ६३० कोटी रुपये एकूण उत्पन्न नोंदवले. गेल्या वर्षीच्या याच कालावधीत कंपनीने ६३५ कोटी रुपयांचे एकूण उत्पन्न नोंदवले होते.

दरम्यान कंपनीची नफाक्षमता (ईबीडटा) १८ टक्के म्हणजेच ११२ कोटी रुपये राहिली आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीत कंपनीचा ईबीडटा ११६ कोटी रुपये होता. कंपनीने २६ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्यात १५.४ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित केला आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारी अक्षय ऊर्जा कंपनीच्या पुणे येथील प्रकल्पासाठी वापरली जात आहे. तसेच, नवीन बॉयलर सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या वैधानिक मंजुरीची कंपनीला प्रतीक्षा असून ती लवकरच मिळण्याची शक्यता आहे.

नियामक नियमांमध्ये झालेल्या बदलांमुळे, कंपनी आता महाड येथील प्रकल्पाच्या बांधकामासाठी पर्यावरणविषयक मंजुरी मिळवण्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया करत आहे. कंपनीने प्रामुख्याने नैसर्गिकरित्या विघटित होणारे आणि कंपोस्टेबल (खत होण्यायोग्य) असे विविध प्रकारचे वैशिष्ट्यपूर्ण कागद तयार करण्यावर आपले लक्ष केंद्रित केलेले आहे. ■ ■ ■




## आय फायनान्सचा आयपीओ आज खुला होणार

आय फायनान्स लिमिटेडने आपल्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी (आयपीओ) प्रत्येक २ रुपये दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी १२२ रुपये ते १२९ रुपये किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ किंवा इश्यू) सोमवार, ९ फेब्रुवारी, २०२६ रोजी खुला होईल आणि बुधवार, ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी बंद होईल.

गुंतवणूकदार किमान ११६ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ११६ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. आजच्या तारखेनुसार, २ रुपये दर्शनी मूल्याचे १९१,७४५,५०७ इक्विटी शेअर्स आऊटस्टँडिंग आहेत. हा आयपीओ ७१० कोटी रुपयांपर्यंतचा नवीन इश्यू आणि गुंतवणूकदार - अल्फा वेव्ह इंडिया, एमएजे इन्व्हेस्ट फायनान्शियल इन्क्लुजन फंड , कॅपिटलजी एलपी, एलजीटी कॅपिटल इन्व्हेस्ट मॉरिशस पीसीसी विथ सेल आणि विक्रम जेटली यांच्याद्वारे ३०० कोटी रुपयांपर्यंतचा विक्री-प्रस्ताव आहे. ही कंपनी एक नॉन-बँकिंग वित्तीय कंपनी मिडल लेयर आहे, जी संपूर्ण भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) कर्ज देण्यावर लक्ष केंद्रित करते. ■ ■ ■

## सिएटलमध्ये व्यापार आणि गुंतवणुकीसंदर्भात वर्ल्ड ट्रेडचे मिशन



व्यापार कराराची घोषणा करून भारत-अमेरिका संबंध तुटल्यानंतर काही दिवसांतच, वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईने ऑल-इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज (एआयएआय) च्या सहकार्याने सिएटलहून एक उच्चस्तरीय व्यावसायिक शिष्टमंडळाचे आयोजन केले. सिएटल मेट्रोपॉलिटन चेंबर ऑफ कॉमर्स आणि ग्रेटर सिएटल पार्टनर्स यांनी आयोजित केलेल्या वॉशिंग्टन राज्यातील हे पहिले भारत-केंद्रित नेतृत्व मिशन आहे, ज्यामध्ये व्यवसाय, रिअल इस्टेट, तंत्रज्ञान, विमान वाहतूक आणि अर्थव्यवस्थेतील ३५ हून अधिक वरिष्ठ नेते आहेत जे संपूर्ण व्यापार संबंधांना व्यापतात.

सिएटल प्रदेशातील आर्थिक ताकद, नावीन्यपूर्ण परिसंस्था आणि भारतीय कंपन्यांसाठीएक मोठी संधी आहे. या संधींबद्दल, सिएटल प्रदेशातील स्नोहोमिश काउंटी, काउंटी एक्झिक्युटिव्ह डेव्ह सोमर्स म्हणाले, स्नोहोमिश काउंटी सिएटल शहराला एरोस्पेस हब म्हणून स्थान देणारी ऐतिहासिक बोईंग फॅक्टरी आयोजित करते. सिएटलमध्ये आम्ही व्यापार आणि गुंतवणुकीत आंतरराष्ट्रीय सहकार्याला महत्त्व देतो. उच्च मूल्याच्या उत्पादनाचे केंद्र असण्याचा अनुभव असल्याने, आम्ही एरोस्पेस, प्रगत उत्पादन आणि दूरसंचार तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि पायाभूत सुविधा विकास यासारख्या क्षेत्रात सहयोग करू इच्छितो.

येत्या काही महिन्यांत आम्ही आंतरराष्ट्रीय मानकांनुसार विमान इंधनासाठी एक शाश्वत केंद्र विकसित करू ज्यामुळे आंतरराष्ट्रीय खेळाडूंना संधीची एक खिडकी उपलब्ध होईल. आंतरराष्ट्रीय व्यापारावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याने, आम्ही सिएटलमधील स्नोहोमिश काउंटीमध्ये व्यापार आणि विकासासाठी नेहमीच खुले आहोत. ■ ■ ■

## एयू स्मॉल फायनान्स बँक व होंडा मोटरसायकलचा दुचाकी वितरणासाठी करार




भारतातील सर्वात मोठी स्मॉल फायनान्स बँक असलेल्या आणि युनिव्हर्सल बँकेत रूपांतरित होण्यासाठी दशकभरात प्रथमच तत्वतः मान्यता मिळालेल्या एयू स्मॉल फायनान्स बँकेने, होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया सोबत धोरणात्मक सामंजस्य करार केला आहे.

या सहकार्यामुळे संपूर्ण भारतातील ग्राहकांना होंडा दुचाकी खरेदी करण्यासाठी परवडणारे आणि सोयीस्कर कर्ज पर्याय उपलब्ध होतील. होंडा दुचाकींसाठी पसंतीचे वित्तपुरवठादार म्हणून, एयू स्मॉल फायनान्स बँक अकाऊंट ग्रीगेटरच्या मदतीने विश्लेषणावर आधारित जलद क्रेडिट निर्णय प्रक्रिया प्रदान करेल. तसेच, ग्राहकांना सुलभ कर्ज अनुभवासाठी डिजिटल पेमेंट उपाय दिले जातील.

या भागीदारीमध्ये होंडाच्या डीलरशिप्स आणि एयू बँकेच्या शाखांमधून संयुक्त मार्केटिंग आणि प्रसिद्धी मोहिमांचाही समावेश आहे. या भागीदारीची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे कागदविरहित प्रक्रियाः प्रथमच दुचाकी खरेदी करणाऱ्यांसह सर्व श्रेणीतील ग्राहकांसाठी ही भागीदारी स्वप्नपूर्ती ठरेल. यामध्ये कागदविरहित प्रक्रियेमुळे कर्जाची पात्रता लवकर तपासली जाईल. तसेच होंडाच्या ग्राहकांना स्पर्धात्मक योजना, जाहिरात ऑफर्स आणि प्री-अप्रुव्हड (पूर्व-मंजूर) ऑफर्सचा लाभ मिळेल. एयू बँकेच्या ग्राहकांना ऑनलाइन अर्ज, रिअल- टाइम स्टेटस ट्रॅकिंग आणि विनाअडथळा कर्ज प्रक्रियेसह होंडाच्या दुचाकी खरेदी करता येतील. ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# ओबीसींचे १७ फेब्रुवारीला भव्य आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

नागपुरात सकल ओबीसी महामोर्चाच्या वतीने आयोजित बैठकीत ओबीसींच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर मंथन करण्यात आले असून, या बैठकीत १७ फेब्रुवारी रोजी नागपुरात भव्य आंदोलन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार आणि यूजीसीचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पार पडली.



या बैठकीत विदर्भातील प्रमुख ओबीसी संघटनांनी जातीनिहाय जनगणनेतील तांत्रिक त्रुटींवर तीव्र असंतोष व्यक्त केला. प्रामुख्याने घरसूची प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ मध्ये ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नसल्याने समाजाच्या घटनात्मक हक्कांवर भविष्यात गदा येण्याची शक्यता बैठकीत वर्तवण्यात आली. यासोबतच यूजीसीच्या नव्या धोरणांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली असून, या सर्व तांत्रिक आणि धोरणात्मक त्रुटींच्या निषेधार्थ १७ फेब्रुवारीला आंदोलनाचा एल्गार पुकारला जाणार आहे.

या बैठकीनंतर विजय वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, जनगणनेच्या संदर्भात तसेच यूजीसीच्या संदर्भात आमच्यात चर्चा झाली. ओबीसीची जनगणना होणार नसेल तर हे अन्यायकारक आहे. सरकारकच्या दरवाजात या सगळ्याच्या विरोधात १७ तारखेला आम्ही संविधान चौकातून धरणे आंदोलन सुरू करणार आहोत. या जनगणनेमध्ये जोपर्यंत ओबीसीचा समावेश होत नाही, तोपर्यंत मोठे आंदोलन या देशात उभारले जाणार आहे. या पलीकडे जाऊन ओबीसी संमेलन देखील आम्ही आयोजित करणार आहोत.

यूजीसीचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यावेळी बोलताना म्हणाले, ओबीसीला अदर कॅटेगरीमध्ये टाकण्यात आले आहे. त्यांचा ओबीसी म्हणून समावेश असावा. दूसरा मुद्दा जो आहे यूजीसीचा, त्यात जातीत भेदभाव जो आहे, एसटी, एससी आणि ओबीसी हा क्लॉज कायम ठेवावा. त्यानंतर जातीच्या आधारावर जो भेदभाव होतो त्याची जी लिस्टिंग ती कायम ठेवावी. आणि २०२६ च्या कायद्याला सुधारित करून त्याला लागू करावे.

### कुठल्याही राजकीय बॅनरखाली हे आंदोलन नाही

विजय वडेट्टीवार म्हणाले, या आंदोलनात मोठ्या संख्येने येतील. १७ तारखेपासून ही सुरुवात होणार आहे. ज्यांना ज्यांना यायचे आहे ते येतील. याला राजकीय स्वरूप देता येणार नाही. ओबीसीच्या हक्कासाठी तिथे यायचे आहे. कुठल्याही राजकीय बॅनरखाली हे आंदोलन नाही. ओबीसीच्या हक्काचे मिळाले तर त्यांचे जे आताचे प्रश्न आहेत, ते सगळे प्रश्न दूर होतील

## भारतात चित्त्यांची तिसरी तुकडी फेब्रुवारी अखेर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ८ :

चित्ता स्थलांतर प्रकल्पाअंतर्गत दक्षिण आफ्रिकेतील बोत्सवाना येथून पुन्हा एकदा भारतात आठ चित्ते आणले जाणार आहेत. सुरुवातीला हे चित्ते दोन तुकडीत आणण्याचे ठरले होते. मात्र, त्यावर अजून शिक्कामोर्तब झाले नसले तरीही फेब्रुवारीच्या अखेरच्या आठवड्यात मध्यप्रदेशात आठ चित्ते आणले जाणार हे निश्चित आहे.

यापूर्वी मे २०२५ मध्ये चित्त्यांची पहिली तुकडी आणि डिसेंबर अखेरीस चित्त्यांची दुसरी तुकडी येणार होती. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने ही माहिती दिली होती. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत चित्ता प्रकल्पाची आढावा बैठक घेण्यात आली होती. मात्र, आता २०२६ मध्ये फेब्रुवारी अखेरीस चित्ते येणार आहेत. देशातील चित्ता प्रकल्पावर आतापर्यंत ११२ कोटी रुपयापेक्षा अधिक खर्च झाला आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्यातील उच्चस्तरीय बैठकीत चित्त्यांच्या स्थलांतराचा रोडमॅप अंतिम करण्यात आला.

## श्री आवजीसिद्ध महाराजांच्या भंडाऱ्याला ७० हजार भाविकांची मांदियाळी

# ५०० चुलींवर भाजल्या भाकरी...

■ अनिल भगत, जळगाव जामोद, दि. ८ :

सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या सुनगाव येथे ग्रामदैवत श्री आवजीसिद्ध महाराज यांचा वार्षिक भंडारा महोत्सव ७ फेब्रुवारी रोजी अत्यंत उत्साहात संपन्न झाला. श्रद्धेच्या या महाकुंभात सहभागी होण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यासह जळगाव (खानदेश), अकोला आणि शेजारील मध्य प्रदेशातून हजारो भाविकांनी हजेरी लावली. सुमारे ७० हजार भक्तांनी महाराजांच्या दर्शनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेतला.



या महोत्सवाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथील शिस्त आणि महिलांना दिला जाणारा सन्मान. महाप्रसादाच्या वितरणावेळी सर्वप्रथम महिला भाविकांना पंगतीत बसवून सन्मानाने भोजन दिले जाते. महिलांच्या पंगती पूर्ण झाल्यानंतरच पुरुष मंडळींच्या पंगती बसवण्याची परंपरा या ठिकाणी जपली जाते. हजारो भाविकांची गर्दी असूनही अत्यंत शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने हा भोजन सोहळा पार पडला. सुनगाववासीयांसाठी हा भंडारा केवळ धार्मिक विधी नसून तो एक कौटुंबिक जिव्हाळ्याचा सोहळा आहे.

गावात दिवाळी-दसऱ्याला जेवढी गर्दी नसते, त्यापेक्षा अधिक उत्साह या उत्सवात दिसतो. परगावी असलेल्या गावातील लेकी-सुना या महोत्सवासाठी आवर्जून घरी येतात, ज्यामुळे गावाला सणाचे स्वरूप प्राप्त झाले होते.

महोत्सवासाठी लागणारे साहित्य ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीने मंदिर परिसरात आणले गेले. पुरुष मंडळी डाळ शिजवण्याची जबाबदारी सांभाळतात, तर गावातील व बाहेरील महिलांनी मिळून ४०० ते ५०० चुलींवर महाप्रसादासाठी भाकरी भाजल्या. श्रद्धेच्या या चुलींवर तयार झालेला हा प्रसाद घेण्यासाठी सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली होती.

या भंडाऱ्यात सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी उपस्थिती लावून महाप्रसादाचा आस्वाद घेतला. एवढ्या मोठ्या जनसमुदायावर नियंत्रण मिळवण्यासाठी ठाणेदार नितीन पाटील, पीएसआय नागेश खाडे, पीएसआय स्नेहा शेडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला. यामध्ये पोलीस हेडकॉन्स्टेबल इरफान शेख, दिपमाला वानखडे, शांतीलाल धिरबस्सी, पोलीस कॉन्स्टेबल संदीप रिंढे,सुपाजी तायडे, प्रफुल्ल डब्बे, मंगेश सोळंके,भरत बोंद्रे, सतिष पाटोळे यांच्यासह संपूर्ण पथकाचे मोलाचे सहकार्य लाभले. श्री आवजिसिद्ध महाराज संस्थानच्या उत्कृष्ट नियोजन बद्दल ठाणेदार नितीन पाटील यांनी अध्यक्ष सुरेश अंबडकार यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. चोख पोलीस बंदोबस्त व कायदा सुव्यवस्थे बद्दल संचालक मंडळाच्या वतीने सुध्दा ठाणेदार नितीन पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

"श्री आवजीसिद्ध महाराजांवरील अढळ श्रद्धा हीच या उत्सवाचा कणा आहे. दरवर्षी भाविकांचा आकडा वाढत आहे, हे पाहून समाधान वाटते. हा केवळ संस्थानचा कार्यक्रम नसून प्रत्येक सुनगाववासीयाचा वैयक्तिक सोहळा आहे. महिलांना प्रथम प्राधान्य देऊन पंगती वाढणे ही आमची जुनी परंपरा आहे. हजारो महिलांचे श्रम आणि ग्रामस्थांची सेवा यामुळेच एवढा मोठा सोहळा निर्विघ्नपणे पार पडतो."

**सुरेश अंबडकार**
(अध्यक्ष, श्री आवजीसिद्ध महाराज संस्थान, सुनगाव)